सार्वजनिक उपक्रम समिती

(२०१०-२०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांच्या

कामकाजासंबंधात महाराष्ट्र शासनाच्या सन २००३-२००४ च्या हिशेबावरील भारताचे

नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक)

अहवालातील प्रकरण दोन मधील अनुक्रमे

परिच्छेद क्रमांक २.८, २.९, २.११, २.१२, २.१५, २.२४, व २.२६ यावरील समितीचा

पहिला अहवाल

(दिनांक १४ डिसेंबर, २०१० रोजी विधानसभेस / विधानपरिषदेस सादर केला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.

सार्वजनिक उपक्रम समिती

(२०१०-२०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांच्या

कामकाजासंबंधात महाराष्ट्र शासनाच्या सन २००३-२००४ हिशेबावरील भारताचे

नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या (वाणिज्यिक)

अहवालातील प्रकरण दोन मधील अनुक्रमे

परिच्छेद क्रमांक २.८, २.९, २.११, २.१२, २.१५, २.२४, व २.२६ यावरील समितीचा

पहिला अहवाल

सार्वजनिक उपक्रम समिती (बारावी विधानसभा)
(२०१०-२०११)

	समिती प्रमुख
१)	श्री. सदाशिवराव पाटील, वि.स.स.
	सदस्य
२)	श्री.मधुकर ऊर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
३)	कु.प्रणिती शिंदे, वि.स.स.
** ४)	श्री. डी.पी.सावंत, वि.स.स.
५)	डॉ.कल्याण काळे, वि.स.स.
६)	श्री.सुभाष घोटे, वि.स.स.
७)	श्री.विवेकानंद पाटील, वि.स.स.
८)	श्री. विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.
९)	श्री. संजय वाघचौरे, वि.स.स.
१०)	श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.
११)	श्री. बदामराव पंडित, वि.स.स.
१२)	श्री. सुरेश देशमुख, वि.स.स.
१३)	श्री. जयकुमारभाऊ रावल, वि.स.स.
१४)	श्री. अतुल देशकर, वि.स.स.
१५)	श्री. विजयकुमार देशमुख, वि.स.स.
१६)	श्री. प्रमोद जठार, वि.स.स.
१७)	श्री. राजन विचारे, वि.स.स.
१८)	श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स.
१९)	श्री. महादेव बाबर, वि.स.स.
२०)	श्री. प्रविण दरेकर, वि.स.स.
२१)	श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
२२)	श्री. चरणसिंग सप्रा, वि.प.स.
२३)	श्री. हेमंत टकले, वि.प.स.
२४)	श्री. संजय केळकर, वि.प.स.
* २५)	श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री. अ.ना.कळसे, प्रधान सचिव,
श्री. श्रीधर राजोपाध्ये, उप सचिव,
श्री. सुधीर वळवी, अवर सचिव (समिती),
श्री. अ. ल. जोशी, कक्ष अधिकारी

* श्री. अनिल परब, वि.प.स. यांची सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्याच्या रिक्त जागी श्रीमती शोभाताई फडणविस वि.प.स. यांची दि. ६ ऑगस्ट, २०१० पासून नियुक्ती करण्यात आली.

** श्री.डी.पी.सावंत, वि.स.स. यांची दिनांक १८ नोव्हेंबर, २०१० रोजी राज्यमंत्री म्हणून मंत्रीमंडळामध्ये नियुक्ती झाल्यामुळे रिक्त जागा.

सार्वजनिक उपक्रम समिती (अकरावी विधानसभा)
(२००८-२००९)

	समिती प्रमुख
१)	श्री. अमर काळे, वि.स.स.
	समिती सदस्य
२)	श्री. बच्चु कडु, वि.स.स.
३)	श्री. किसन कथोरे, वि.स.स.
४)	श्री. संतोषभाऊ चौधरी, वि.स.स.
५)	श्री. संजय चव्हाण, वि.स.स.
६)	श्री. प्रदिप जाधव-नाईक, वि.स.स.
७)	श्री. नरहरी झिरवाळ, वि.स.स.
८)	श्री. राजेंद्र दर्डा, वि.स.स.
९)	श्री.गणपत कदम, वि.स.स.
१०)	श्री. पी.यु. मेहता, वि.स.स.
११)	श्री. मधुकर ठाकुर, वि.स.स.
* १२)	श्री. मदन पाटील, वि.स.स.
१३)	श्री. शिवराम दळवी, वि.स.स.
१४)	श्री. संदिपान भुमरे, वि.स.स.
१५)	श्री. शरद ढमाले, वि.स.स.
१६)	श्री. अरविंद नेरकर, वि.स.स.
१७)	श्री. विजय जाधव, वि.स.स.
१८)	श्री. अरुण पाटील, वि.स.स.
१९)	श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.
२०)	श्री. नारायणराव गव्हाणकर, वि.स.स.
२१)	श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स.
२२)	प्रा.फौजिया खान, वि.प.स.
२३)	श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.
२४)	श्री. मधुकर चव्हाण, वि.प.स.
२५)	श्री. अनिल परब, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

श्री. अ.ना.कळसे, प्रधान सचिव,
श्री. वि.दि.जोशी, सह सचिव,
श्री. श्रीधर राजोपाध्ये, उप सचिव,
श्री. सुधीर वळवी, समिती अधिकारी,
श्री. एस.एन.सानप, कक्ष अधिकारी

* श्री. मदन पाटील वि.स.स. यांची दि.१३ डिसेंबर, २००८ रोजी मंत्री म्हणून मंत्रीमडंळात नियुक्ती झाल्यामुळे रिक्त जागा.

सार्वजनिक उपक्रम समिती (अकरावी विधानसभा)

(२००७-२००८)

- सदस्यांची यादी -

	समिती प्रमुख
१)	श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स.
	सदस्य
२)	श्री. शशिकांत शिंदे, वि.स.स.
३)	श्री. बशिर पटेल, वि.स.स.
४)	श्री. संजय चव्हाण, वि.स.स.
५)	श्री. रमेशभाई कदम, वि.स.स.
६)	श्री. चंद्रशेखर भोसले, वि.स.स.
७)	श्री. राजवर्धन कदमबांडे, वि.स.स.
८)	श्री. राजेंद्र दर्डा, वि.स.स.
९)	श्री. गणपतराव कदम, वि.स.स.
१०)	श्री. प्रद्युम्न मेहता, वि.स.स.
११)	श्री. प्रतापराव चिखलीकर, वि.स.स.
१२)	श्री. मदन पाटील, वि.स.स.
१३)	श्री. संदीपानराव भुमरे, वि.स.स.
१४)	श्री. दिनकर माने, वि.स.स.
१५)	श्री. नामदेवराव पवार, वि.स.स.
१६)	श्री. रविंद्र गायकवाड, वि.स.स.
१७)	श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.
१८)	श्री. अरुण पाटील, वि.स.स.
१९)	श्री. मदन येरावार, वि.स.स.
२०)	श्री. नारायणराव गव्हाणकर, वि.स.स.
२१)	श्री. सुरेश देशमुख, वि.प.स.
२२)	श्री. विश्वनाथ डायगव्हाणे, वि.प.स.
२३)	श्री.सदाशिव पोळ, वि.प.स.
२४)	श्री.मुधुकर सरपोतदार, वि.प.स.

२५)	श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स.

अनुक्रमणिका

अनुक्रमांक (१)	तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना	
एक	**महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ** (ले.प.अ. २००३-२००४)	
	१) निष्फळ कामकाजाचे तास (परिच्छेद क्रमांक २.८)	
	२) खाजगी संस्थेकडून वापरलेल्या खत कारखान्यांची खरेदी. (परिच्छेद क्रमांक २.९)	
	३) फळ प्रक्रिया कारखाने खाजगी संस्थेला सुपुर्द करण्यामधील त्रुटी (परिच्छेद क्रमांक २.११)	
	४) पशुखाद्याचे उत्पादन (परिच्छेद क्रमांक २.१२)	
	५) माल पाठवणी तत्वावर खरेदी करण्यात अपयश (परिच्छेद क्रमांक २.१५)	
	६) जाहिरात कंत्राटाचे प्रदान (परिच्छेद क्रमांक २.२४)	
	७) आस्थापना खर्च (परिच्छेद क्रमांक २.२६)	
दोन	बैठकींचे परिशिष्ट	

प्रस्तावना

मी, सार्वजनिक उपक्रम समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरुन महाराष्ट्र शासनाच्या सन २००३-२००४ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या अहवालातील (वाणिज्यिक) प्रकरण दोन मधील महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांच्या कामकाजासंबंधात परिच्छेद क्रमांक २.८, २.९, २.११, २.१२, २.१५, २.२४, व २.२६ यावरील समितीचा पहिला अहवाल (बारावी महाराष्ट्र विधानसभा) सादर करीत आहे.

कृषि व फलोत्पादन विभाग व महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर व माहितीवर अकरावी महाराष्ट्र विधानसभेच्या समितीने मंगळवार, दिनांक २१ ऑगस्ट, २००८ रोजी व बुधवार दिनांक ३ ऑक्टोबर, २००८ रोजी महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादितच्या प्रतिनिधींची व विभागीय सचिवांची साक्ष नोंदवून घेतली होती.

श्रीमती संगीता चौरे, महालेखाकार (वाणिज्यिक लेखा परिक्षा) यांनी निमंत्रणानुसार समितीच्या बैठकीना उपस्थित राहून त्यावेळेस समितीला केलेल्या मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांचे आभार मानते. कृषि व फलोत्पादन विभागाचे तत्कालीन प्रधान सचिव श्री.नानासाहेब पाटील, तसेच महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाचे तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक डॉ.प्रदिप व्यास व तत्कालीन महाव्यवस्थापक, श्री.मंगेश पारकर, यांनी दिलेल्या त्यावेळच्या समितीला संपूर्ण सहकार्याबद्दल समिती त्यांचे आभार मानते.

समितीने मंगळवार, दिनांक १४ डिसेंबर, २०१० रोजी झालेल्या बैठकीत या अहवालावर विचार करुन तो सुधारणांसह संमत केला.

सदाशिवराव पाटील,
समिती प्रमुख,
सार्वजनिक उपक्रम समिती.

विधान भवन,
नागपूर,

महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित

एक :- निष्फळ कामकाजांचे तास

१.१ : भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००३-२००४ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक २.८ " निष्फळ कामकाजाचे तास " यामध्ये महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहे की,

"कंपनी युरीया, डाय ॲमोनियम फॉस्फेट, एसएसपी, म्युरेट ऑफ पोटॅश इत्यादी सारखे मूळ खते एकत्रित करुन आपल्या एनपीके कारखान्यांमध्ये एनपीकेचे उत्पादन करते. एनपीके कारखान्यांमधील उपलब्ध कामकाजाचे तास पूर्णपणे वापरण्यात येत नव्हते, त्यामुळे निष्फळ श्रमाची किंमत द्यावी लागते. १९९९-२००४ या कालावधीत सहा एनपीके कारखान्यांमध्ये उपलब्ध असलेले श्रम तास व निष्फळ श्रम तास यांची थोडक्यात स्थिती खालीलप्रमाणे होती.

तपशील	१९९९-२०००	२०००-०१	२००१-०२	२००२-०३	२००३-०४ (तात्पुरता)
एकूण उपलब्ध कामकाजांचे तास	३९,८४०	३९,२८८	४५,१९२	४४,४२४	४५,१४४
वापरण्यात आलेले तास	२४,८८०	२४,२३३	२४,६४६	१८,६०२	२२,०२७
निष्फळ तास	१४,९६०	१५,०५५	२०,५४६	२५,८२२	२३,११७
एकूण उपलब्ध तासांशी निष्फळ तासांची टक्केवारी	३७.६	३८.३	४५.५	५८.१	५१.२
प्रत्येक तासाची श्रम किंमत (रुपये)	१,२५०	१,२९९	१,१५२	१,१०३	१,१०७
नियंत्रण योग्य निष्फळ श्रम तास (उत्पादन कार्यक्रम नसणे व कच्चा माल उपलब्ध नसणे)	७,३०५	७,६४२	१३,६३५	१९,२०८	१८,७२५
नियंत्रण योग्य निष्फळ तासांची एकूण निष्फळ तासांची टक्केवारी	४८.८	५०.८	६६.४	७४.४	८१.०
निष्फळ श्रम किंमत (रुपये कोटीत) (५X६)	०.९१	०.९९	१.५७	२.१२	२.०७

निष्फळ तास जे १९९९-२००० या वर्षात ३७.६ टक्के होते ते २००२-०३ या वर्षात ५८.१ टक्क्यापर्यंत वाढले होते. त्यामुळे निष्फळ श्रम किंमत जी १९९९-२००० मध्ये रुपये ९१.३१ लाख होती ती २००२-०३ या वर्षात रुपये २.१२ कोटी एवढी वाढली होती. ८१ टक्के एकूण निष्फळ कामकाज तासापैकी नियंत्रण योग्य निष्फळ तास ४८.८ टक्के एवढे होते. कंपनीने निष्फळ तास उत्पादनाच्या कमतरतेमुळे निष्फळ तास वाढल्याचे म्हटले होते. यामध्ये वाढता आर्थिक बोजा असल्यामुळे निष्फळ श्रम किंमत कमी करण्याची आश्यकता आहे."

१.२ : या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखा ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमुद केले की ,एन.पी.के. उत्पादीत करण्याच्या खत उद्योग हंगामी स्वरुपाचा आहे तेव्हा तीनही पाळयातील कामाचे २४ तास पूर्ण उपलब्ध असतात असे म्हणता येत नाही.संपूर्ण वर्षात जास्तीत जास्त २/३ काळासाठीच तीन्ही पाळयात उत्पादन घेता येते व १/३ काळासाठी एकाच पाळीत उत्पादन घेता येत असते. ह्या शिवाय २४ तासात तीन पाळया म्हणत असलो तरी पाळी बदलतांना प्रत्येकी १ तास जात असतो म्हणजे प्रत्यक्षात तीनही पाळया मिळून जास्तीत जास्त २१ तासच उपलब्ध होतात. ही परिस्थिती लक्षात घेता सरासरी वर्षात ५१५३ तास प्रती करखान्यास मिळू शकतात. हे खालील तक्त्यामध्ये दिसून येईल.

महीने	सुट्या	प्रत्यक्ष कामाचे दिवस ९ दिवस	दररोजीचे तास	एकूण कामाचे तास
एप्रिल	४	२६	२१	५४६
मे	५	२६	२१	५४६
जुन	४	२६	२१	५४६
जुलै	४	२७	२१	५६७
ऑगस्ट	६	२५	२१	५२५
सप्टेंबर	४	२६	८	२०८
ऑक्टोबर	४	२७	८	२१६
नोव्हेंबर	४	२६	८	२०८
डिसेंबर	४	२७	८	२१६
जानेवारी	६	२५	२१	५२५
फेब्रुवारी	४	२४	२१	५०४
मार्च	४	२६	२१	५४६

ह्या आधारावर लेखा अहवालातील नमूद केलेल्या आकडेवारी ऐवजी पाच वर्षांची आकडेवारी आकडेवारी खालील प्रमाणे येईल.

तपशील	१९९९-२०००	२०००-०१	२००१-०२	२००२-०३	२००३-०४
वरील प्रमाणे एकूण उपलब्ध कामाचे तास	२५७६५	२७०५३	३०९१८	३०९१८	२५७६५
वापरलेले तास	२४८८०	२४२३३	२४६४६	१८६०२	२२०२७

न वापरण्यात आलेले तास	८८५	२८२०	६२७२	१२३१६	३७३८
वापरण्यात न आलेल्या तासाची प्रत्यक्ष उपलब्ध तासा बरोबर टक्केवारी	३.४३	१०.४२	२०.२८	३९.८३	१४.५०
प्रती तास श्रम किंमत	रु.१२५०	रु.१२९९	रु.११७२	रु.११०३	रु.११०७
नियंत्रित होवू शकतील असे न वापरलेले कामाचे तास	४४३	१४१०	३०८८	६१५८	१८६९
निष्फळ तासांची श्रम किंमत	०.०६	०.१८	०.३६	०.६८	०.२१

जरी उपलब्ध पूर्ण तास वापरले गेले नाहीत व वापरलेल्या तासांचा खर्च वाढलेला दिसतो तरी त्याचा परिणाम नफयावरती मोठया प्रमाणात झालेला नाही, शिवाय न वापरले गेलेले तास वापरताही आले असते पण २००१-०२, २००२-०३ मध्ये हवामान, पाऊस शेतीसाठी पोषक नसल्यामुळे खताच्या विक्रीवर परिणाम झाला होता व त्यामुळे महामंडळाला तशी
संधी मिळू शकली नाही. मात्र २००३-०४ च्या आकडेवारीवरुन असे दिसून येईल की, महामंडळ परिस्थिती नियंत्रणाखाली आणू शकले आहे.

१.३ : स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासन सहमत असल्याचे नमूद आहे.

१.४ : या प्रकरणी समितीला महामंडळाकडून व शासनाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने प्रधान सचिव, कृषि विभाग व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांची साक्ष दिनांक २१/८/२००७ रोजी घेतली. साक्षीच्या वेळी समितीने नियंत्रणयोग्य निष्फळ तासांची सद्य:स्थिती काय आहे ? या महालेखाकारांनी केलेल्या आक्षेपाबाबत समितीने विचारणा केली असता महामंडळाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, महामंडळाने जरी उपलब्ध पूर्ण तास वापरले गेले नाहीत व वापरलेल्या तासांचा खर्च वाढलेला दिसतो तरी त्याचा परिणाम नफ्यावरती मोठ्या प्रमाणात झालेला नाही, शिवाय न वापरले गेलेले तास वापरताही आले असते पण २००१-२००२ , २००२-२००३ मध्ये हवामान, पाऊस शेतीसाठी पोषक नसल्यामुळे खताच्या विक्रीवर परिणाम झाला होता व त्यामुळे महामंडळाला तशी संधी मिळू शकली नाही. मात्र २००३-२००४ मध्ये महामंडळ परिस्थिती नियंत्रणाखाली आणू शकले आहे. परंतू २००६-२००७ मध्ये रसायनी येथील फर्टीलायझर कंपनी बंद होती. तसेच सध्या देखील कच्चा माल उपलब्ध होण्यामध्येही अडचणी आहेत. फॅक्टरी बंद रहाण्याची बरीच कारणे असतात. डी.ओ.पी.चे पुरवठादार मर्यादित आहेत आणि केंद्र शासनाकडून राज्य

शासनाला कोटा ठरवून दिला जातो. अशा, वेळी डी.ए.पी. च्या बाबतीत, युरियाच्या बाबतीत अडचण असेल, रॉ मटेरिअल उपलब्ध नसेल, तसेच वीज पुरवठा उपलब्ध नसेल तर कारखाना बंद ठेवावा लागतो. काही वेळेला कामगारांच्या बाबतीत सुध्दा प्रश्न निर्माण होतात. त्याच प्रमाणे प्लॉटचे ओव्हर ऑईलिंग करावयाचे असेल किंवा तो ब्रेक डाउन झाला तरी देखील कारखाना बंद ठेवावा लागतो. या कारखान्यातून ठराविक कालावधीसाठी उत्पादन होत असते. खरीपाच्या पेरणीसाठी जून महिन्यापासून चांगली मागणी असते आणि रब्बीसाठी ऑक्टोबर-नोव्हेंबर पासून पेरणीच्या कामास सुरूवात होते. अशा वेळी मधल्या कालावधीसाठी उत्पादन करण्यासाठी ३६५ दिवस तीन पाळीमध्ये कारखाना सुरू ठेवू शकत नाही. जास्तीतजास्त आठ महिन्यासाठी जास्त क्षमतेने कारखाना चालविला जातो आणि राहीलेले तीन-चार महिने एक पाळीमध्ये कारखाना चालविण्यात येतो. मागच्या दोन-तीन वर्षामध्ये फर्टीलायझरच्या बाबतीत उलाढाल वाढली असून परिस्थिती सुधारलेली आहे.

सध्या २००६-२००७ ची लेख्याची तपासणी करीत आहोत, पण जवळजवळ ३६४ कोटीपर्यंत उलाढाल झालेली आहे आणि तो मागील सहा वर्षाच्या तुलनेमध्ये सर्वात जास्त आहे. मागच्या चार-पाच वर्षामध्ये हे महामंडळ तोट्यामध्ये हाते, परंतु आता २००६-२००७ व पुढील काळात हे महामंडळ नफ्यामध्ये येणार आहे.

महामंडळाची परिस्थिती सुधारत आहे. परंतु जे निष्फळ तास आहेत, त्यामध्ये काही सुधारणा झाली आहे का ? याबाबत समितीने विचारले असता महामंडळाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, बरेचसे तास आमच्या नियंत्रणाखाली नाहीत. आपले बरेच कारखाने जून पासून बंद आहेत. कारण आपल्याकडे डी.ए.पी. उपलब्ध नाही.

काही गोष्टी महामंडळाच्या नियंत्रणामध्ये नाहीत, तर महामंडळाच्या कक्षे बाहेर आहेत. महाराष्ट्रात डी.ए.पी.ची उपलब्धता कमी आहे. तसेच आयुक्त कार्यालयामधून असे आदेश काढले जातात की, ठराविक उत्पादनासाठी डी.ए.पी चा वापर करू नये. याबाबतीत समितीने संबंधित विभागाच्या प्रधान सचिवांचे मत विचारले असता सध्या सर्व राज्यांमध्ये डी.ए.पी.चा वापर करू नये, असे आदेश आहेत सध्या सर्व राज्यामध्ये डी.ए.पी.ची. कमतरता आहे. याबाबत पुढील काळात डी.ए.पी.ची कमतरता नसेल, पण कच्च्या मालाची, युरियाची कमतरता आहे.

सध्या महामंडळाच्या कारखान्यांची जी स्थिती आहे, त्यापेक्षा खाजगी खत कारखान्याची स्थिती चांगली आहे. त्यांना युरिया मिळतो, खतामध्ये मल निचरा करण्यासाठी परवानगी मिळते आणि ते कारखाने नफ्यामध्ये चालत आहेत. निष्फळ तासांमुळे जे नुकसान होत आहे त्याबाबतीत जो मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे, त्या मुद्दयाकडून समितीचे लक्ष वळविले जात आहे. **महामंडळाचे खत कारखाने तोट्यामध्ये आहेत. त्याचे कारण नियोजन चुकीचे होत आहे. पुरेसे डी.ए.पी.उपलब्ध होत नाही, वीज पुरवठा व्यवस्थित होत नाही, इत्यादी कारणे सांगितली जात आहेत,ती समितीला न पटणारी आहेत.** याबाबत महामडळाच्या प्रतिनिधीनी खुलासा केला की, महालेखाकारांनी जी आकडेवारी दिली आहे, त्यानुसार १९९९-२००० पासून नियंत्रित होवू शकतील असे न वापरलेले कामाचे तास ५० % आहेत असे म्हटले तर **निष्फळ तासाच्या कामाची किंमत रू. ६ लाख इतकी येते आणि २०००-२००१ मध्ये कामगारावरील खर्च १८ लाख आणि २००१-२००२ मध्ये ३६ लाख आहे.** परंतु त्यावेळेचा उलाढालीच्या मानाने ही आकडेवारी कमी आहे. २००१-२००२ मध्ये नियंत्रित होवू शकतील असे न वापरलेले कामाचे तास **३०८५** असून निष्फळ कामाची **श्रम किंमत** ३६ लाख काढण्यात आली आहे.

आपण ३६५ दिवस तीन पाळीमध्ये कारखाना चालवू शकतो का ? त्या साठी आवश्यक असलेले घटक पुरवू शकतो का ? हे पहाण्याची जबाबदारी कोणाची आहे ? खताचे उत्पादन ही अव्याहनपणे चालणारी पध्दत आहे. यासाठी लागणारे जे घटक आहेत म्हणजे कच्चा माल, वीज, पाणी इ.बाबतीत कमतरता निर्माण झाली तर ही प्रक्रिया कशी सुरू रहाणार आहे ? या सर्व बाबींची पूर्तता करण्याची जबाबदारी कोणाची आहे ? याबाबत समितीने विचारणा केली असता महामंडळाने खुलासा केला की, सर्व बाबींची पूर्तता करण्याची जबाबदारी महामंडळाची आहे आणि त्यादृष्टीने प्रयत्न करीत आहोत. त्यामध्ये अनेक वेळा सफलता मिळते, तर अनेक वेळा ही बाब महामंडळाच्या आवाक्याबाहेरची असते. परंतु तरीही सध्याची परिस्थिती चांगली आहे.

व्यवसायाच्या दृष्टीकोनातून उत्पादन तयार ठेवणे फायदेशीर नसते. जर तयार केलेल्या मालाला मागणी नसेल आणि त्याची किंमत जास्त असेल तर अशा वेळी कारखाना चालविण्यापेक्षा तो बंद ठेवणे फायद्याचे असते. महामंडळाच्या बाबतीत व्यवसायीक दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे असे समितीचे म्हणणे आहे.

मागणी आणि पुरवठा याचे नाते आहे. त्यामुळे दोन प्रश्न निर्माण होतात की, जर मागणी नसेल तर उत्पादन का काढण्यात आले ? दुसरे म्हणजे जर मागणी असेल तर कमतरता का निर्माण झाले ? हे दोन्ही प्रश्न एकमेकाला पूरक आहेत. जर मागणी असेल तर निष्फळ तासाचा प्रश्न येत नाही आणि जर मागणी नव्हती तर त्यासंदर्भात कोणती व्यवस्था करण्यात आली आहे ? याबाबत समितीने विचारले असता महामंडळाने खुलासा केला की, आम्ही प्रत्येक फॅक्टरीकडून दर महिन्याला, दर आठवड्याला विवरण घेतो. उपलब्ध तासांपैकी कंपनीमध्ये किती तास काम चालते, कोणत्या कारणांमुळे काम बंद होते याची माहिती घेतली जाते. परंतु काही बाबी अशा असतात की, त्याचे नियंत्रण महामंडळाकडे नसते तसेच याबाबत विभागाचे प्रधान सचिव यांनी खुलासा केला की,निष्फळ तासांची टक्केवारी फार जास्त आहे असे नाही. सन १९९९-२००० मध्ये ८८५ तास, २०००-२००१ मध्ये २८२० तास इतके निष्फळ तास होते. खाजगी क्षेत्रामध्ये सुध्दा असे निष्फळ तास जातात. तेव्हा निष्फळ तासाची टक्केवारी फार मोठी आहे असे मला वाटत नाही.

सन २००४-२००५ मध्ये किती पाळया राबविल्या याबाबत महामंडळाने खुलासा केला की, सन २००४-२००५ मध्ये २३८१४ तास, २००५-२००६ मध्ये १८७५६ तास त्यापैकी निष्फळ तास ६२१९, २००६-२००७ मध्ये १९३७४ तास काम झाले म्हणजे वाढ झालेली आहे. थोड्याफार प्रमाणात घट आणि वाढ होत असते. तसेच विभागाचे प्रधान सचिव यांनी खुलासा केला की, खताची स्थिती अशी आहे की, युरिया, फॉस्फरस व पोटॅशियमचा तुटवडा नाही. परंतु डी.अे.पी.चा तुटवडा संपूर्ण भारतात आहे. केंद्र सरकारने सर्व राज्यांना कळविले आहे की., डी.अे.पी. तुम्हीच आयात करा केंद्र सरकार डी.अे.पी.चा पुरवठा करू शकणार नाही. जर आम्ही मिश्र खतामध्ये डी.अे.पी. वापरला तर तो आम्हाला कमी पडतो. शेतकऱ्यांना प्रथम डी.अे.पी.देतो त्यानंतर शिल्लक राहिलेला डी.अे.पी. मिश्र खतांसाठी दिला जातो. मिश्रखतासाठी डी.अे.पी. पुरेसा उपलब्ध होवू शकत नाही.

अभिप्राय व शिफारशी :

१.५ : समितीचे या प्रकरणी असे अभिप्राय आहेत की,महामंडळाचे खत कारखाने तोट्यामध्ये आहेत. त्याचे कारण नियोजन चुकीचे होते. डी.ए.पी. उपलब्ध होत नाही, पुरेसा वीज पुरवठा होत नाही. इत्यादी महामंडळाने दिलेली कारणे समितीस संयुक्तिक वाटत नाही. व्यवसाय दृष्टीकोनातून विचार केल्यास मालाला मागणी नसेल आणि त्याची किंमत जास्त असेल तर अशा वेळी कारखाना चालविण्यापेक्षा तो बंद ठेवणे फायद्याचे असते. मागणी नसतानांही महामंडळाने उत्पादन चालु ठेवल्यामुळे महामंडळास मोठे नुकसान झालेले आहे. सन १९९९-२००० मध्ये निष्फळ कामाचे तास ३७.५% होते. त्यामध्ये सन २००२-२००३ मध्ये ५८.१ रुपयांपर्यंत वाढ झालेली आहे. अधिक उत्पादन होण्याच्यादृष्टीने निष्फळ तासाचे प्रमाणे कमी होणे आवश्यक होते. सबब, समिती अशी शिफारस करते की, महामंडळाने भविष्यामध्ये निष्फळ कामकाजाचे तासाचे प्रमाण कमी करुन वाया जाणारी निष्फळ श्रम किंमत नियंत्रणात ठेवावी. आणि योग्य नियोजन करून व मागणीचा अंदाज घेवून मालाचे उत्पादन करावे तसेच उत्पादन केलेल्या सर्वच मालाची विक्री करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी.

दोन : खाजगी संस्थेकडून वापरलेल्या खत कारखान्यांची खरेदी

२.१ : भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००३-२००४ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक. २.९ मध्ये "खाजगी संस्थेकडून वापरलेल्या खत कारखान्यांची खरेदी " या संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की,हिमको खत निर्मीती खाजगी मर्यादित, जालना या कंपनीच्या संयंत्राचा लिलाव सिकॉम मर्यादित यांनी केला त्यांच्याकडून एनपीके व एसएसपी संयंत्रे रुपये १.७१ कोटी (रुपये ७२.९१ लाख इमारत किंमतीसह) किंमतीला कंपनीने खरेदी (जानेवारी २००१ मध्ये) केली होती. या खरेदीला संचालक मंडळाची मान्यता होती. कंपनीने रुपये ४२.५७ लाखाचा भांडवली खर्च करुन एनपीके कारखान्याचे कामकाज कंपनीने मे २००१ मध्ये सुरु केले होते. या एनपीके कारखान्यामधील एनपीके खतांचे प्रत्यक्ष उत्पादन अनुक्रमे १७,१८३ मे.टन (२००१-०२) व १६,९५९ मे. टन (२००२-०३) जे स्थापित क्षमतेच्या ५७.३ व ५६.३ टक्के एवढे होते. में २००१ मध्ये घेण्यात आलेला एसएसपी खत कारखान्यांत केलेल्या निष्फळ गुंतवणुकीवर (रुपये १.२९ कोटी) झालेले व्याजाचे नुकसान रुपये ५४.५६ लाख एवढे झाले होते. कंपनीने म्हटले होते (जुलै २००४) की ही संयंत्रे खताची अपेक्षित वाढती मागणी भागविण्यासाठी खरेदी करण्यात आली होती.

हे उत्तर समर्थनीय नव्हते कारण :-

१)कंपनी स्वतःच्या अस्तित्वात असलेल्या संयंत्रांची क्षमता पूर्णपणे वापरत नसतांना नवीन संयंत्राची खरेदी हिताची नव्हती.

२) या खरेदीच्या प्रवर्तकांनी केलेल्या चुकीच्या गुंतवणुकीचा बोजा फक्त कंपनीवर हस्तांतरीत झाला होता.

३) या व्यवहारामुळे फक्त खाजगी संस्थेला तिची सिकॉम मर्यादितला देय असलेल्या दायित्वाचे कर्तव्यपालन पूर्ण करण्यात झाला होता.

२.२ : याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमुद केले आहे की,सन २००१-०२ मध्ये यावेळी जालना येथील सयंत्र विकत घेण्याचा निर्णय घेतला गेला त्यावेळेस महामंडळाच्या पाच कारखान्यांची उत्पादन क्षमता पुढील प्रमाणे २,९०,००० मे.टन होती.

अ) रसायनी	६०००० मे.टन
ब) पाचोरी	७०००० मे.टन
क) नांदेड	७०००० मे.टन
ड) वर्धा	६५००० मे.टन
ई) कोल्हापूर	३०००० मे.टन
एकूण	२९०००० मे.टन

उपरोक्त उत्पादन क्षमतेच्या ९०% क्षमतेपेक्षा अधिकचा वापर करण्यात आला आहे हे खालील ३ वर्षांच्या आकडेवारी वरुन दिसून येईल.

वर्ष	एकुण एनपीके उत्पादन
१९९९-२०००	२,९५,००० मे.टन.
२०००-२००१	२,६८,००० मे.टन.
२००१-२००२	२,६१,००० मे.टन.

महामंडळाच्या पाच कारखान्यापैकी रसायनी येथील कारखाना कमीत कमी वापरला जातो कारण माथाडीच्या कामगारांना दयाव्या लागणाऱ्या जास्त वेतनामुळे उत्पादनाची किंमत जास्त होते.या वरुन असे निदर्शनास येते की, महामंडळाच्या कारखान्यांची उत्पादन क्षमता वापरली गेली नाही असे म्हणता येत नाही.

सन १९९९-२००० मध्ये महामंडळाने विदर्भ व मराठवाडा परिसरात विक्री वाढविण्याच्या दृष्टीने एखादा कारखाना विकत घ्यावा असा निर्णय घेतला होता. तदनुशंगाने वृत्तपत्रात जाहिराती देवून निविदा मागविल्या होत्या. मे.हिमको ह्या एकाच कंपनीने निविदा दिली. अधिक वाव मिळण्याच्या दृष्टिने पुनश्च जाहिरात देण्यात आली व या संदर्भात पाच लोकांनी प्रस्ताव सादर केले संचालक मंडळाने शंभर रुपये प्रती टन लिजवर कारखाना चालवावा असा निर्णय घेतला होता.

ह्या दरम्याने मे.सिकॉम यांनी मे.हिमको यांना वित्त पुरवठा केला होता व कर्ज परत न केल्यामुळे त्यांनी मे.हिमको यांच्या कारखान्यावर टाच आणून तो विकावयाचा आहे अशी जाहिरात वृत्तपत्रात दोनदा छापली.

मे.हिमको यांचा जालना येथील कारखाना जर विकत घेतला तर महामंडळाला औरंगाबाद, अकोला आणि नांदेड या परिसरात खताचा पुरवठा बऱ्याच स्वस्त प्रमाणात करता येईल असे वाटले कारण वाहतुकीच्या खर्चात मोठ्या प्रमाणात बचत होईल.

सदरहू कारखान्याची किंमत मान्यता प्राप्त मुल्यनिधारकाकडून ३.४९ कोटी रुपये निश्चित करण्यात आली.

ह्या कारखान्यातील एम.पी.के. व एस.एस.पी. सयंत्राची एकंदरीत किंमत रु.३.४९ कोटी निर्धारित करण्यात आली होती तरी शासनमान्य मूल्य निर्धारकांच्या अहवालाप्रमाणे ह्या कारखान्याचे मुल्य २.६० कोटी रुपये होते. मे.सिकॉम यांच्या मार्फत १.९० कोटी रुपये हा कारखाना प्रस्तावीत करण्यात आला. गुंतवलेला पैसा परत निघण्याच्या दृष्टिने प्रती वर्ष किती पैसे निघू शकतील याचा अभ्यास केला. प्रती वर्ष रुपये ७३.०० लाख परत मिळतील असे दिसले व ह्या दराने अडिच ते तीन वर्षामध्ये गुंतवणूक निघू शकेल.

वास्तविक पहाता एस.एस.पी. सयंत्र वापरणे फायदयाचे असले तरी ते शक्य नव्हते कारण कारखान्याच्या अजूबाजूला निवासी वसाहत मोठ्या प्रमाणात तयार झाली आहे एस.एस.पी. च्या उत्पादनामुळे प्रदुषण मोठ्या प्रमाणात वाढेल कारण सध्या असलेली प्रदुषण नियंत्रण पध्दत परिपूर्ण नाही शिवाय इतर उत्पादकांचे एस.एस.पी. चे मुल्य आपल्या उत्पादन मुल्यापेक्षा कमी असल्यामुळे हे बाहेरुनच विकत घेणे फायदेशीर आहे.

सदरहू कारखाना विकत घेतल्या नंतर औरंगाबाद व अकोला, नांदेड लगतच्या परीसरात महामंडळाची विक्री चांगल्याच प्रमाणात वाढली आहे हे खालील आकड्यावरुन दिसून येईल.

वर्ष	विक्री/ मे.टन
२०००-२००१	१६२७०
२००१-२००२	१७६१३
२००२-२००३	१६१६३
२००३-२००४	२७०२०
२००४-२००५	३०००८
२००५-२००६	२३१९४

थोडक्यात म्हणजे सदरहू कारखाना विकत घेण्याचा निर्णय महामंडळाच्या हिताचाच होता व ही गुंतवणूक फायदेशीर ठरली असे दिसून येईल.

२.३ : महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासनाने सहमती दर्शविली आहे.

२.४ : महामंडळाकडून व शासनाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने कृषि विभागाच्या प्रधान सचिवांची व महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मे,२००१ मध्ये खरेदी केलेल्या एस.एस.पी. सयंत्र वापराविना पडून आहे काय ? याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ? याबाबत समितीने विचारले असता महामंडळाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, सन २००१-२००२ मध्ये १६२७० मे.टन, २००१-२००२ मध्ये १७६१२ मे. टन, २००२-२००३ मध्ये १६१६३ मे.टन, २००३-२००४ मध्ये २७०३०, २००४-२००५ मध्ये ३०००८ इतके उत्पादन घेतले. मागील सहा वर्षाचा विचार करता जवळपास एक लाखापेक्षा जास्त मे.टन उत्पादन झालेले आहे. यासाठी जी गुंतवणूक केली ती पूर्ण वसूल झालेली आहे. सिकॉमकडून १.९० कोटी रुपयांना हा कारखाना विकत घेतला. प्रत्यक्षात त्याची किंमत ३.४९ कोटी इतकी होती. सिकॉमकडून कारखाना विकत घेतला त्यातून फायदा झालेला आहे. तो कारखाना विकत घेतला त्यामध्ये एनपीके आणि एसएसपी या दोन्ही प्लान्टची एकत्रित किंमत होती. महामंडळाचे एसएसपीचे दोन प्लान्ट आहेत. परंतु त्याचा वापर करीत नाहीत. शिवाय इतर उत्पादकांचे एसएसपीचे मूल्य आपल्या उत्पादन मूल्यापेक्षा कमी असल्यामुळे ते बाहेरून विकत घेणे फायदेशीर आहे. महामंडळाने सिकॉमकडून १.९० कोटी रूपयास कारखाना विकत घेतला त्यामुळे महामंडळास फायदा झालेला आहे. मागणी नसल्यामुळे उत्पादन करू शकत नाही तर दुसरीकडे मागणी वाढली म्हणून २००१-२००२ मध्ये नवीन प्लॉन्ट का टाकला? याबाबत समितीने विचारले असता महामंडळाच्या प्रतिनिधीनी खुलासा केला की, वाहतूक घटक महत्वाचा आहे. ज्या ठिकाणी मागणी जास्त आहे आणि जवळपास प्लान्ट असेल तर आपला फायदा जास्त होतो, उलाढाल वाढते. महामंडळाने जालना येथील कारखाना विकत घेतल्यामुळे औरंगाबाद, अकोला, नांदेड या भागात महामंडळाची विक्री चांगली झालेली आहे.

अभिप्राय व शिफारशी :

२.५ या प्रकरणी समितीला मिळालेल्या लेखी व तोंडी माहिती पहाता समिती अशी शिफारस करते की, एसएसपी बंद असल्याबाबत महामंडळाच्या प्रतिनिधींचा खुलासा विचारात घेता समितीने मत व्यक्त केले की, **महामंडळाने विकत घेतलेल्या एनपीके संचाची किंमत ४१ लाख रूपये आहे आणि एसएसपीची किंमत १.३० कोटी रूपये होती. महामंडळाने फक्त एनपीके संच विकत घेतला असता तर नफा आणखी जास्त झाला असता महामंडळाने व्यवस्थित नियोजन केले नाही महामंडळास एन.पी.के./ एस.एस.पी.संच खरेदीमुळे अपेक्षीत फायदा झाला नसुन नफ्यामध्ये घट झाली आहे. त्यामुळे महामंडळाने भांडवल गुंतवणूक व्यवस्थीत व व्यापारी तत्वानुसार नियोजित पध्दतीने करावी अशी शिफारस समिती करीत आहे.**

तीन :- फळ प्रक्रिया कारखाने खाजगी संस्थेला सुपूर्द करण्यामध्ये त्रुटी.

३.१ : भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००३-२००४ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक २.११ मध्ये "फळ प्रक्रिया कारखाने खाजगी संस्थेला सुपूर्द करण्यामध्ये त्रुटी" या संबंधात महालेखाकारानी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की,
राज्य शासनाने काटोल व मोर्शी येथिल फळ प्रक्रिया कारखाने सिंन्थेटिक इंडिया मर्यादित (एसआयपीएल) यांच्याकडे सुपूर्द करण्याचे डिसेंबर १९९९ मध्ये ठरविले. या निणर्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. सुधारित अटीच्या आधारावर या दोन्ही कारखान्यांच्या मत्ता हस्तातरित करण्यासाठी कंपनीने एसआयपीएल बरोबर करार (एप्रिल २००१) केला होता. काटोल कारखान्यांच्या मत्ता मे २००१ रोजी देण्यात आल्या होत्या परंतु खाजगी संस्थेने मोर्शी कारखाना ताब्यात घेतला नव्हता.

लेखापरीक्षण शेरे खालील प्रमाणे :

- रुपये ९.७५ कोटी मूल्याच्या मत्ता (काटोल-रुपये ८.०७ कोटी, मोर्शी रुपये १.६८ कोटी) एसआयपीएलकडे "बीज भांडवल" म्हणून सुपूर्द करण्यात आल्या व त्या ताबा मिळालेल्या तारखेपासून पाच वर्षाच्या कालावधीत प्रतिवर्ष १४ टक्के व्याजासह परत करावयाच्या होत्या. हया अटीमध्ये सुधारणा (एप्रिल २००१) करण्यात आली व बीज भांडवल हे संचयी विमोचन योग्य अधिमान भाग म्हणून धरण्यात येवून त्याची परतफेड पाच वर्षांनंतर सुरु होवून सहा वार्षिक हप्त्यात परत करावयाची होती व त्यावर प्रतिवर्ष १४ टक्के लाभांश तिसऱ्या वषार्पासून काढावयाचा होता. या अटीमध्ये सुधारणा केल्यामुळे पहिल्या दोन वर्षाचे व्याज अधित्यागित झाले व त्यामुळे संस्थेला २.२६ कोटीचा फायदा देण्यात आला जर या संस्थेला भांडवल व लाभांश प्रदानामध्ये कसूर केला तर काय कारवाई करावयाची याबाबत करारामध्ये कांहीही नमूद केले नव्हते.
- सुधारित अटीनुसार एसआयपीएलला मत्ता प्रथम हक्काने वित्तीय संस्थाकडे गहाण टाकून कर्ज उभारण्यास परवानगी दिल्यामुळे मत्ता सुरक्षिततेला हानी पोहचली होती. त्यामुळे, या बदललेल्या अटीमुळे निधी संयंत्रामध्ये पूर्णपणे गुंतविला आहे की नाही याबाबत खात्री न करता कर्ज रक्कम इतरत्र वळविण्याची संस्थेला संधी देण्यात आली होती.
- करारानुसार एसआपीएलला करारापासून दोन वर्षाच्या आत मोर्शी प्रकल्प सुरु करावयाचा होता. जर कारखाना ताब्यात घेतला नाही तर दंडात्मक कारवाईचे कलम करारामध्ये नव्हते. कंपनीने देखील तो कारखाना कार्यान्वित केला नाही. परिणाम स्वरुप मोर्शी कारखाना (किंमत रुपये १.६८ कोटी) १९९७ पासून विनाकारण पडून होता.

कंपनीने उत्तरात (जुलै २००४) म्हटले होते की हे कारखाने खाजगी संस्थेकडे सपूर्द करावयाचा निर्णय कंपनीच्या संचालक मंडळाने घेतलेला नव्हता तर राज्य शासनाने घेतला होता. संस्थेची निवड राज्य शासनाने नियुक्त केलेल्या खाजगी सल्लागाराने केल्याचे म्हटले होते. परंतु कराराच्या सुरवातीच्या अटींमध्ये ज्या कंपनीच्या वित्तीय हिताच्या नव्हता अशा सुधारणा करण्यात आल्या होत्या हे तथ्य तसेच रहाते.

३.२ या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमुद केले की, काटोल मोर्शी प्रकल्पा करीता महामंडळ एक कार्यकारी संस्था म्हणून शासनाकडून नियुक्त करण्यात आली होती. शासनाच्या सूचने नुसार प्रकल्पाचे काम करणे इथपर्यंतच महामंडळाचा सहभाग होता. शासनाच्या आदेशानुसार सदरहू कारखाना ह्या कंपनीला विकण्यात आला होता. खरेदी विक्री करारनामा करणे ही जबाबदारी महामंडळाला दिली होती व ती महामंडळानी पूर्ण केली. करारनामा स्वाक्षरी करण्यापूर्वी मसूदा शासनाकडून मंजूर करुन घेण्यात आला होता.

ह्या कारखान्याच्या संबंधामध्ये नियंत्रक व लेखा परिक्षक यांनी एक बैठक बोलवीली होती. ज्याचे अध्यक्ष पद बंगलोरचे नियंत्रक व लेखा परिक्षक यांनी भूषविले होते. या बैठकीत शासकीय प्रतिनिधीही उपस्थीत होते. व त्यांनी ह्या बाबतची संपूर्ण माहिती विषद केली होती आणि म्हणून महामंडळाने नियंत्रक व लेखा परिक्षक महोदयांना हा विषय शासना बरोबर घ्यावा असे सुचविले आहे.

ब) कराराप्रमाणे मे.अलायन्स ॲग्रो (इंडिया) प्रा.लि. यांनी कारखान्याची किंमत रिडीमेबल प्रीफरंशिअल शेअर्स स्वरुपात देण्यात आली आहे. महामंडळाचे ह्यावर कुठलेही नियंत्रण शक्य नव्हते त्यामुळे त्यांनी कर्ज घेणे व ते ह्या कंपनीतच लावणे वगैरे बाब महामंडळाच्या अख्यतारीत नाही.

मोर्शी येथील कारखाना घ्यावा वा घेवू नये ही बाब मे.अलायन्स ॲग्रो (इंडिया) प्रा.लि. ह्यांच्यावर सोडण्यात आली होती व तसे त्यांनी दोन वर्षात कळवावयाचे होते. त्याप्रमाणे त्यांनी हा कारखाना घेण्यासंदर्भात असमर्थता कळवली.

चालू वर्षात हा कारखाना कोणी विकत अथवा चालवण्याकरीता घ्यावा यासाठी निविदा मागविल्या होत्या त्याप्रमाणे मे.स्टेफ्रेश, वाशी यांची निविदा प्राप्त असून त्याबाबत योग्य ती कारवाई चालू आहे.

क) मोर्शी येथील कारखाना विकत घेतलाच पाहिजे अशी कुठलीही अट करारनाम्यात नाही. (सदरहू बाबत मुद्दा 'अ' मध्ये विषद केल्या प्रमाणेच आहे.)

३.३ : महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

३.४ : या प्रकरणी समितीला महामंडळाकडून व शासनाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने प्रधान सचिव, कृषि विभाग व व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी **एसआयपीएल बरोबर केलेल्या** करारात दंडात्मक कारवाईचे कलम शासनाच्या सहमतीने वगळण्यात आले होते किंवा कसे ? याबाबत समितीने विचारले असता सचिवांनी खुलासा केला की, शासनाच्या सहमतीने करारातील कलम वगळण्यात आलेले आहे. सदर कलम का वगळण्यात आले यासंदर्भातील कारण मिमांसा फाईलवर देण्यात आलेली नाही. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे याबाबत समितीने अभिप्राय दिलेले नाहीत.

चार : पशुखाद्याचे उत्पादन :-

४.१ : भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००३-२००४ च्या (वाणिज्यक) अहवालातील परिच्छेद क्रमांक २.१२ मध्ये "पशुखाद्याचे उत्पादन" या संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, कंपनीचे चिंचवड (पुणे) व यवतमाळ येथे दोन पशुखाद्य कारखाने आहेत. प्रत्येक कारखान्याची स्थापित क्षमता प्रतिवर्ष ३०,००० मे.टन एवढी होती. यवतमाळ येथील कारखान्याच्या उत्पादनाचा आढावा घेतला असता असे आढळून आले की, हा

कारखाना १९८३ मध्ये अलाप पशुखाद्य उत्पादन कंपनी खाजगी मर्यादित यांच्याकडून भाडेपट्टयावर घेण्यात आला होता व १९९९-२००४ या कालावधीत विदर्भ क्षेत्रामध्ये प्रत्यक्ष क्षमतेचा (३०,००० मे.टन) वापर ३.२ ते ८.७ टक्के एवढाच होता त्यामुळे उत्पादन क्षमता मोठया प्रमाणावर कमी वापरली गेली होती. यवतमाळ कारखान्यात उत्पादित केलेल्या पशुखाद्याची विक्री कंपनी प्रतिटन रुपये ७२३ ते रुपये १,७५३ एवढा तोटा सहन करुन करीत होती. १९९९-२००३ या कालावधीमधील एकूण तोटा रुपये ६१.३४ लाख झाला होता.
कंपनीने हा कारखाना अद्याप परत केला नव्हता व तोटा होणे अधिक चालूच होते. कंपनीने म्हटले (जुलै २००४) होते संस्थेकडून रुपये ५३.७२ लाख अधिक व्याज मिळाले नव्हते म्हणून एकक परत केले नाही व वसुलीसाठी न्यायालयीन दावा (नोव्हेंबर, १९९४) केला होता. ही बाब थकित ठेवून उत्पादनाची इतर क्षेत्रात मालाची विक्री वाढविण्यासाठी उपायोजना करणे आवश्यक आहे. त्यामुळे कंपनीने वाढीव उत्पादनातून स्थिर किंमत वसूल होण्यास मदत झाली असती.

४.२ : या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने असा खुलासा केला आहे की, महामंडळाने मे.अलप कॅटल फिड यांच्या विरुध्द दावा दाखल केला असून महामंडळाच्या हाती असलेल्या शेअरच्या आधारावरुन महामंडळ सदरहू कारखान्यावर मालकी हक्क बजावू कसे असे वाटते. अशा परिस्थितीत सदरहू कारखाना मे.अलप कॅटल फिडस यांना हस्तातरण करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

कारखान्यात असलेले गोदाम खते साठीविण्याकरीता वा कार्यालयीन जागा उपविभागीय कार्यालय यांच्या करिता वापरण्यात येत आहे. ज्यायोगे भाडयापोटी दयावा लागणाऱ्या मोठया रक्कमेची बचत होत आहे.

४.३ : महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

४.४ : या प्रकरणी समितीला महामंडळाकडून व शासनाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने प्रधान सचिव, कृषि विभाग व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी यवतमाळ येथील पशुखाद्य सयंत्राच्या उत्पादन क्षमतेच्या प्रत्यक्ष वापराची सद्यस्थिती काय आहे ? याबाबत समितीने विचारले असता महामंडळाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, यवतमाळ येथील कारखाना सन १९८३ पासून महामंडळ चालवित आहे. आतापर्यंत या कारखान्याची परिस्थिती अत्यंत वाईट होती. सन २००० मध्ये कारखान्यात ६ ते ७ नवीन फिडर घेतल्यामुळे उत्पादनात वाढ झालेली आहे. तसेच सन १९८३ साली सदर कंपनीने पशुखाद्याचे उत्पादन करण्याकरिता काही प्रमाणात कर्ज घेतले . महामंडळाला त्यावेळी वाटले होते की, आपणाला प्लॉटची गरज आहे. त्यावेळी त्यांसदर्भात करार करण्यात आला, प्लॉट घेण्यासाठी महामंडळाने २९.२८ लाख रूपये कंपनीला दिले त्यावेळी सदर कंपनीचे शेअर्स ट्रान्सफर होणार नव्हते. परंतु त्यातील ३८८८ शेअर्स ट्रान्सफर करण्यात आले. अशी बरीच कारणे यामध्ये आहेत. त्यानंतर सन १९९९-२००० मध्ये कंपनीने १ लाख शेअर्स काढले, त्यामुळे वाद निर्माण झाले. महामंडळाच्या मान्यतेशिवाय कंपनीने नवीन शेअर्स काढू नयेत असे करारामध्ये होते. सदर कंपनीने महामंडळाची मान्यता न घेता नवीन शेअर्स काढल्यामुळे त्यांच्यावर दावा दाखल करण्यात आलेला आहे. सन २००० मध्ये महामंडळाने यासंदर्भातील धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. गेल्या दोन-तीन वर्षापासून यवतमाळ येथील कंपनीला चांगला फायदा झालेला आहे. सदर कंपनीला २९.२१ लाख रूपये दिलेले आहेत. कंपनीने एक लाख

शेअर्स कागदेशिररित्या काढलेले नाहीत. त्यांनी शेअर्स हस्तांतरीत केल्याशिवाय त्यांना उर्वरित रक्कम देता येणार नाही. महामंडळाने कंपनीला जास्त रक्कम दिलेली नाही.

४.५ : अभिप्राय व शिफारशी :

. या बाबत समिती असे अभिप्राय व्यक्त करते की, सदर प्रकरण महामंळाने व्यवस्थित हातळलेले नाही. यामध्ये महामंडळाचे गैरव्यवस्थापन झालेले आहे. महामंडळाने २९.२१ लाख रूपये कंपनीला दिलेले आहे. महामंडळ व कंपनी यामध्ये सुरू असलेला कायदेशिर बाबीवरील वाद सोडवून त्यांच्यामधील व्यवहाराला नियमितता आणण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

पाच : माल पाठवणी तत्वावर खरेदी करण्यात अपयश :-

५.१ : भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००३-२००४ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद २.१५ मध्ये "माल पाठवणी तत्त्वावर खरेदी करण्यास अपयश" या संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले की, कंपनी खते व किटकनाशके यांची खरेदी खाजगी संस्थाकडून करते ज्या वस्तूची बाजारातील विक्री स्थितीबाबत चाचणी केलेली नसते अशा वस्तूची खरेदी कंपनीच्या वित्तीय हिताची जपणूक करण्यासाठी मालपाठवणी तत्वावर करणे हे मूळ तत्व आहे. अशा प्रकारणामध्ये रोखीने प्रदान करणे स्पष्टपणे कंपनीच्या हिताचे नसते.

लेखापरीक्षणाच्या असे निदर्शनास आले की, कंपनीने या महत्वाच्या तत्वाचे विचलन करुन काही उत्पादनांची खरेदी रोखीच्या तत्वाने केली त्याबाबतची चर्चा खालीलप्रमाणे आहे. हया मालाची विक्री करण्यामध्ये खूप मोठा कालावधी लागला परिणाम स्वरुप उशीरा विक्रीचे पैसे मिळाल्यामुळे नसते व्याजाचेच नुकसान झाले असे नाही तर न विकलेला माल खराब देखील झाला होता.

वस्तू	पुरवठयाचा कालावधी	खरेदी किंमत (रुपये लाखात)	शेरे
बायोफर्टिलायझर (मे.सोना ॲग्रोव्हेट लेबॉरेटरी, मुंबई)	१९९९-२००२	७४.५९	खरेदी आदेशाच्या शर्थी व अटीनुसार न विकलेला माल पुरवठाकाराला परत केला नव्हता. मार्च २००४ पर्यंत मालसाठयाची पाठविण्याची किंमत रुपये ११.६७ लाख एवढी होती. रुपये ११.१८ लाखाचा माल खराब झालेल्या स्थितीत पडून होता(ऑगस्ट २००४)
खते (मायक्रोप्लेक्स इंडिया, वर्धा)	२०००-०१	३९.३६	हे उत्पादन बाजारात नवे होते. रुपये ३२.७३ लाखाचा माल विकण्यास चार वर्षाचा कालावधी लागला होता. खराब झालेल्या स्थितीत रुपये ६.६३ लाखाचा माल पडून होता.

कीटकनाशके-प्रहार (मे.ग्रीन फार्म ऑरगॅनिक, वरोरा)	२००१-०२	२१.१५	मुलत: हा मालपाठवणी तत्वावर खरेदी करण्याचे प्रस्तावित करण्यात आले हाते. परंतु त्यावेळेच्या व्यवस्थापकीय संचालकाच्या सांगण्यावरुन हा माल रोख तत्वाने खरेदी करण्यात आला. एकूण खरेदी केलेल्या रुपये २१.१५ लाख किंमतीच्या ९,९४६ लिटर्सपैकी कंपनी मूळ किंमत रुपये ३.३१ लाख असलेल्या १,५६८ लिटर्सपैकी विक्री रुपये ३.२७ लाखाला करु शकली होती. उर्वरित खरेदी केलेला मालसाठा (८.३७८ लिटर्स) किंमत रुपये १७.८४ लाख खराब स्थितीत पडून होता.

कंपनीने म्हटले (जुलै २००४) होते की खराब झालेला मालसाठा विकण्याचे सर्व प्रयत्न करण्यात येत आहेत व भविष्यात चाचणी न झालेला माल मालपाठवणी तत्वावरच खरेदी करण्याचे ठरविण्यात आले.

५.२ : या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्तमक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करतांना असे नमुद केले की, अ) जिवाणू खते : (मे.सोना ॲग्रीव्हेट लॅब्रारेटरी, मुंबई) मे.सोना ॲग्रीव्हेट लॅबोरेटरी, मुंबई महाएग्रोझाईम ह्या खताची निर्मिती करत असतात, ह्यात अमोनीया ॲसिड, कार्बोहायड्रेटम व विटामीन्स असतात. विक्री वाढविण्याच्या दृष्टिने हे उत्पादन आपण विक्रीची यादीत समाविष्ट करावे असा निर्णय पूर्ण माहिती अंती घेण्यात आला. विक्री लक्षांका प्रमाणे ही खरेदी केली ती व प्रत्यक्ष होऊ शकलेली विक्री पुढील प्रमाणे होती.

(रु.लाखात)

खरेदी			विक्री	
वर्ष	**नग**	**मुल्य (लिटर)**	**नग**	**मुल्य (लिटर)**
१९९८-१९९९	**६७१४**	**२३.९५**	**२१८७**	**८.२९**
१९९९-०१	**९०७६**	**३२.२१**	**९९४४**	**३९.५१**
२०००-०१	**५२४७**	**१८.५६**	**४६४०**	**१८.४९**
२००१-०२			**११७०**	**४.६३**
२००२-०३			**१३६**	**०.५४**
२००३-०४			**१४३**	**०.५७**
२००४-०५			**७९**	**०.३०**
एकूण	**२१०३७**	**७४.७२**	**१८२९९**	**७२.३३**

खरेदी पैकी रु.९.७२ लाख किमतीचा साठा बाकी आहे व हा मुदत बाहय झाल्यामुळे विक्री होऊ शकणार नाही. हयाचे रिफॉम्युलेशलन होवू शकते काय हयाची माहिती उत्पादकाकडून घेण्यात येत आहे व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. महामंडळाचे पैसे अडकून पडले हयाबाबत असे की,खरेदी रु.७४.७२ लाख आणि विक्री रु.७२.३३ लाख थोडक्यात म्हणजे प्रत्यक्षात रु.२.४९ च अडकले आहेत.एकूण विक्रीच्या तुलनेने ही रक्कम गौण आहे व एखादा नवीन उत्पादन घेताना असा प्रकार होवू शकतो व तशी जोखीम घ्यावीच लागते.

ब) खते (मॅक्रोप्लेक्स इंडिया, वर्धा) :-
एकूण रु.६.६३ लाख साठा पैकी रु.२.०२ लाख साठा विकला असून दिनांक ३१-३-२००५ रोजी रु.४.६१ लाख चा साठा शिल्लक आहे व हा मुदतबाहय आहे हयाचे पुरवठादाराला पैसे दिले नाही व हा साठा रिफॉम्युलेट करुन द्यावा अशी विनंती केली आहे.

क) जंतूनाशके :- प्रहार (मे.ग्रीन फार्म ऑरगनीक, वरोरा)
प्रहार हे नैसर्गिक किटकनाशक तसेच हॉरमोन्स वृध्दींगत करणारे आहे. हे एक चांगले उत्पादन होते व त्यापासून अस्तित्वात असलेली उत्पादक मर्यादा वाढ होण्याची शकयता होती. बाजारातील परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर असा निर्णय घेण्यात आला की, १०,००० लिटरची विक्री खुल्या बाजारात करावी असे ठरविण्यात आले. सर्वोतोपरी प्रयत्न करुनही व शासनाच्या विविध योजनांखाली विक्री करणे शक्य नसल्यामुळे फक्त १,६७९ लिटरची विक्री झाली आणि ८२६७ लिटर साठा शिल्लक राहिला.

वर्ष	**खरेदी**		**विक्री**		**(रु.लाखात)**
	नग	**किंमत**	**नग**	**किंमत**	
२००१-०२	**९९४६ लिटर**	**२१.१५**	**१२६९ लिटर**		**२.८२**
२००२-०३			**९९**		**०.१५**
२००३-०४			**२८६**		**०.४४**
२००४-०५			**२५**		**०.३३**
एकूण	**९९४६**	**२१.१५**	**१६७९**		**३.४४**

विभागीय कार्यालयांना अशा सुचना देण्यात आल्या आहेत की, त्यांनी हयाबाबतची पडताळणी करवी व साठा निरंक करण्याकरीता एक प्रस्ताव सादर करावा. कार्योपरांत अहवाल सादर केल्यावरच प्रहारच्या विक्रीवर निवळ तोटा किती झाला हे काढणे शक्य होईल. हया विषयाचे सविस्तर परिक्षण सुरु असून त्यानंतरच जबाबदारी निश्चित होईल.

५.३ : महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

५.४ :या प्रकरणी समितीला महामंडळाकडून व शासनाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने प्रधान सचिव, कृषि विभाग व व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी वापराविना पडून राहिलेल्या साठ्याबाबत सद्य:स्थिती काय आहे ? याबाबत समितीने विचारले असता महामंडळाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, या प्रकरणी एकूण तीन उत्पादने होती. मॅक्रोप्लेक्स इंडिया, वर्धा यांनी पुरविलेल्या एकूण ६.६३ लाख रूपयांच्या साठ्यापैकी २.०२ लाख रूपयांचा साठा विकला असून दिनांक ३१/३/२००५ रोजी ४.६१ लाख रूपयांचा साठा शिल्लक होता. हा साठा रिफॉर्म्युलेट करून घेतला असून विक्रेत्यांना वितरीत केले आहे, डिसेंबरपर्यंन्त हा साठा नियमित होईल.

महाएग्रोझाईम खाताच्या खरेदीपैकी ९.७२ लाख रूपये किंमतीचा साठा शिल्लक आहे व हा साठा मुदतबाह्य झाल्यामुळे विक्री होवू शकली नाही. याचे रिफॉर्म्युलेशन होवू शकते काय याबाबतची माहिती उत्पादकांकडून घेण्यात येत आहे व त्याचप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. एकूण रूपये **७४.७२ लाख खरेदीपैकी रूपये ७२.३३ लाखाची विक्री झाली असून रूपये २.४९ लाख अडकले आहेत. ही बाब खरी आहे** की, हे खत आपण रिफॉम्युलेट करू शकलो नाही, परंतु एकूण विक्रीच्या तुलनेत महामंडळाचा तोटा कमी झाला आहे.

प्रहार हे जंतूनाशक असून १०,००० लिटरच्या खरेदीपैकी १,६७९ लिटर विक्री झाली व ८२६७ लिटर साठा शिल्लक राहिला. याबाबत सर्वकष चौकशी सुरू आहे. हे उत्पादन रिफॉर्म्युलेट का करू शकलो नाही, याबाबतची तपासणी करण्यात येत आहे. प्रहारची खरेदी २१.१५ लाख रूपयांची होती व विक्री ३.४४ लाख रूपयांची झाली. या उत्पादन महामंडळाला थोडा तोटा झाला आहे. कमर्शियल ऑर्गनायझेशनमध्ये काही उत्पादनाच्या बाबतीत फायदा होतो तर काही बाबतीत तोटा होतो. परंतु, महामंडळाची उलाढाल लक्षात घेता प्रहारमध्ये आलेला तोटा फार मोठा नाही. यासंबंधी निर्णय त्यावेळच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी घेतला आहे. महाएग्रोझाईम खरेदीसंदर्भात सुरूवातीला त्यांनी अशी अट घातली होती की, जोपर्यंत मटेरियल लिक्विडेट होत नाही तोपर्यंत रक्कम अदा करता येणार नाही. महाएग्रोझाईमबाबत ३० दिवसांच्या आत रक्कम अदा करतो, असे कंपनीने सांगितले होते, परंतु एकमत होत नव्हते म्हणून संबंधित कंपनीने लोक आयुक्तांकडे तक्रार केली. माननीय लोक आयुक्तांनी असा निर्णय दिला की, जरी उत्पादन विकले गेले नसले तरी उर्वरित प्रदान पैशाचे कंपनीला करण्यात यावे. मात्र प्रहारची सर्व रक्कम अडकली आहे, ही वस्तुस्थिती आहे. या **योजनासंबधीचा निर्णय बोर्डाने घेतला असून ही नविन योजना नाही. हे नवीन उत्पादन आहे.**

बाजारात उत्पादनाला मागणी नव्हती, त्यामुळे विक्री झाली नाही व महामंडळाचे नुकसान झाले, महामंडळामध्ये पणन विभाग आहे. पणन विभागामधील अधिकाऱ्यांनी मार्केटचा अभ्यास केला नव्हता काय ? याबाबत समितीने विचारले असता महामंडळाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, **महामंडळाकडून पूर्वी व्यापार केला जात नव्हता.** सन २००० मध्ये काही उत्पादनांच्या बाबतीत महामंडळाला असे वाटले की, काही **उत्पादनांचा समावेश करून व्यवसाय करावा. त्यानुषंगाने निर्णय झाला मात्र काही उत्पादने शिल्लक राहीली.**

पणन विभागाच्या अधिकाऱ्यांनी याबाबतचा अभ्यास केला नव्हता काय ? महामंडळाने त्यांच्या सल्ल्याशिवाय निर्णय घेतला काय ? महामंडळाला एकूण तोटा किती झाला आहे

याबाबत समितीने विचारले असता महामंडळाने खुलासा केला की, **पणन विभागाच्या सल्ल्यानेच कार्यकारी संचालक मंडळ निर्णय घेते. तसेच १८ लाख रूपयाचा प्रहारचा माल पडला आहे व सहारप्रोझाईनमध्ये २ लाखाचा तोटा झाला आहे.** हा सर्व व्यवहार दोन-तीन वर्षामधील आहे. सन २००१-२००२ मध्ये प्रहारचा व्यवहार झाला, त्यावेळी श्री.झुत्सी हे व्यवस्थापकीय संचालक होते, आता ते सेवानिवृत्त झाले आहेत. **महाएग्रोझाईमचा व्यवहार दोन-तीन वर्षाच्या कालावधीत झाला आहे. त्यामुळे कुणा एकावर जबाबदारी निश्चित करता येणार नाही.** ७४ लाख रूपयांचा माल घेतला व ७२ लाख रूपयांमध्ये विकला, व्यवसाय वाढविण्यासाठी हे सर्व करावे लागते. अनेक ठिकाणी असे घडू शकते की, काही ठिकाणी फायदा कमी होतो, कमर्शियल ऑर्गनायझेशनमध्ये असे होत असते.

५.५ : अभिप्राय व शिफारशी :

या प्रकरणी समिती असे अभिप्राय व्यक्त करते की, कृषि विकास हे महामंडळ व्यावसायिक महामंडळ असून उत्पादन करण्यात येणाऱ्या मालाला बाजारात मागणी मिळविण्यासाठी व उत्पादन केलेल्या मालाची संपूर्ण विक्री होण्यासाठी आवश्यक ती पावले उचलून महामंडळास होणारे नुकसान कमी करता आले असते असे समितीचे स्पष्ट मत आहे. महामंडळाने व्यावसायिक दृष्टीकोन समोर ठेवून उत्पादने केलेले नसल्यामुळे महामंडळास नुकसान झाले याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते व यापूढे व्यावसायिक दृष्टीकोन समोर ठेवून उत्पादन करावे अशी समितीची शिफारस आहे.

सहा : जाहिरात कंत्राटाचे प्रदान :-

६.१ : भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००३-२००४ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक २.२४ मध्ये "जाहिरात कंत्राटाचे प्रदान" यासंबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले की, सार्वजनिक पैसा खर्च करतांना निविदा मागविण्यात पारदर्शकता असणे आवश्यक आहे. कंपनीने स्वयंम कम्युनिकेशन खाजगी मर्यादित, मुंबई (रत्ना पब्लिसीटी) या कंपनीची निवड जाहिरांतीसाठी इतर संस्थाकडून दर न मागविताच केली होती व त्यांना हिरवा वाटाणा व बासमती तांदुळ यांचे पणन करण्यासाठीच्या जाहिराती तयार करण्याचे कंत्राट प्रदान केले होते. एकूण रुपये ४१.१० लाख किंमीतीच्या जाहिरात कामामध्ये मोठमोठे होर्डिंग (रुपये २१.१३ लाख), पाऊचेसची छपाई (रुपये ५.३० लाख), जाहिरातीचा थीम (रुपये ५.२५ लाख), इलेक्ट्रॉनिक सिलेंडर (रुपये ३.९६ लाख) व (रुपये ५.४६ लाख), कामांचा समावेश होता.

स्पर्धात्मक निविदा मागविल्या नसल्यामुळे योग्य दर मिळाले की नाही व दर कमीत कमी आकारण्यात येत होते की नाही ही बाब स्पष्ट होत नव्हती. झालेला संपूर्ण खर्च रुपये ४१.१० लाख निष्फळ ठरलाच त्याशिवाय वाटाणा व बासमती तांदळाचा व्यापार हाती न घेतल्यामुळे कंपनीच्या प्रतिमेला धक्का बसला होता. कंपनीने म्हटले (जुलै २००४) होते की संस्थेने केलेल्या सादरी करणाच्या आधारावरच संस्थेला कामाचे कंत्राट प्रदान केले होते.

लेखापरिक्षणात खालील बाबी निदर्शनास आल्या :-

- २००१-०२ पर्यंत जाहिरात देणाऱ्या संस्थेची शॉर्ट लिस्टींग/ निवड निविदा पध्दतीनेच करण्यात येत होती. शॉर्ट लिस्ट केलेल्या संस्थांना सादरीकरणासाठी बोलविल्यानंतर कमीत कमी स्विकाराल दराने कंत्राट देण्यात येत होते. परंतु २००२-०३ या वर्षात निविदा पध्दती पाळण्यात आली नव्हती व चार जाहिरात संस्थाना सादरीकरणासाठी बोलविले होते.
- संस्थांकडून सादरीकरणापूर्वी दरपत्रके घेण्यात आली नव्हती परंतु संस्थेची

निवड केल्यानंतर ती घेण्यात आली होती.

- २००२-०३ या वर्षात त्याच संस्थेला जाहिरातीची रुपये १.४० कोटीची विविध कामे इतर संस्थाकडून स्पर्धात्मक दर न मागविता परत परत देण्यात आली होती. जाहिरात खर्चामध्ये प्रामुख्याने जाहिरात व निविदा नोटीस (रुपये ३६.०४ लाख), लॅमिनेटेड बोर्डस, लेफलेट्स व पोस्टर्स (रुपये २३.१७ लाख), प्रचार थीम (रुपये १६.२८ लाख), रेडिओ प्रसारण (रुपये १२.२८ लाख), बॅनर्स व माहितीपत्रके (रुपये ७.१४ लाख) व इतर
(रु. ४५.०९ लाख) यांचा समावेश होता. निविदांचा अभाव असल्यामुळे दर योग्यतेची तपासणी करणे शक्य झाले नाही.

६.२ : या प्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने असे नमूद केले की, महामंडळाच्या उत्पादनाच्या जाहिरातीचे सन २००२-०३ चे कंत्राट निश्चित करण्यासाठी काही जाहिरात कंपन्याकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या व त्याच्या प्रात्यक्षिकासाठी मे. रतना हयांचे प्रात्यक्षिक योग्य वाटल्याने जाहिरातीचे कंत्राट त्यांना दिले (त्यांनी त्यांचे नांव नंतर बदलून मे. स्वयंम कम्यूनिकेशन प्रा.लि.असे केले आहे.)

सर्वसाधारण पध्दती प्रमाणे एकदा कंत्राट निश्चित केल्यावर जाहिरातीचे सर्व काम मे. स्वयंम कम्यूनिकेशन प्रा.लि.हयांना देण्यात आले.

एकदा एका वर्षाकरीता एखाद्या संस्थेस नियुक्त केल्यानंतर प्रत्येक कामासाठी पुन्हा पुन्हा निविदा मागवून काम करुन घेण्याची प्रथा नाही शिवाय **क्रिएटिव्ह** कामाचे कंत्राटाचे काही **स्टँडर्ड** ठरविता येत नाही त्यामळे **स्टँडर्ड** दरही राहू शकत नाही.

प्रसिध्दीचे काम संबंधीत विभाग प्रमुखांच्या सहमतीने देण्यात आले. उपरोक्त कारणास्तव मे. स्वयंम कम्युनिकेशन प्रा.लि.हयांचे नावे कार्यादेश देण्यात आले.

६.३ : मंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

६.४ : या प्रकरणी समितीला महामंडळाकडून व शासनाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने प्रधान सचिव, कृषि विभाग व व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी स्पर्धात्मक दराचा अभाव असताना आकारण्यात आलेले दर स्पर्धात्मक असल्याचे कसे ठरविण्यात आले याबाबत समितीने विचारले असता महामंडळाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, महामंडळाने असा एक नवीन उपक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला होता की, बासमती तांदुळ व हिरव्या वाटाण्याचा व्यवसाय करावा. या नवीन विक्री उत्पादनांची जाहिरात करण्यासाठी जाहिरात कंपन्यांकडून दरनिविदा मागविण्यात आल्या होत्या. सुरूवातीला निविदा जाहिर केल्यानंतर केवळ एका जाहिरात कंपनीकडून प्रतिसाद मिळाला. त्यामुळे पुन्हा निविदा काढण्यात आल्या व त्यास चार कंपन्यांचा प्रतिसाद मिळाला. या चार कंपन्यांपैकी रत्ना ॲडव्हटायझिंग कंपनीचे प्रदर्शन योग्य वाटले म्हणून त्या कंपनीची निवड करण्यात आली व त्यांच्याकडून जाहिरात सामुग्री तयार करून घेण्यात आली. जर महामंडळाला त्यावेळी व्यवसायच करावयाचा नव्हता किंवा व्यवसाय करण्यासाठी ज्या पायाभूत सुविधा लागतात त्या उपलब्ध नसतांना जाहिरातीसाठी एवढा खर्च का करण्यात आला याबाबत समितीने विचारले असता महामंडळाच्या

प्रतिनिधींनी खुलासा केला की, तत्कालीन कृषिमंत्री आणि तत्कालीन कार्यकारी संचालक यांची बैठक झाली व असा निर्णय घेण्यात आला की, बासमती तांदुळ व हिरवा वाटाणा यांचा व्यवसाय करण्यात यावा व त्यादृष्टीने जाहिरात कंपनीला कंत्राट देण्यात आले. त्यावेळी जो निर्णय घेण्यात आला होता त्याचा योग्य पाठपुरावा झाला नाही. त्यामुळे योजना राबविण्यास दोन-तीन वर्षाचा विलंब पडला.त्यावेळी सदर उत्पादनच तयार नव्हते तरीदेखील आपण जाहिरातीसाठी ४० लाख खर्च का केला याबाबत समितीने विचारले असता महामंडळाच्या प्रतिनिधीनी खुलासा केला की, यासंदर्भात जबाबदारी निश्चित करुन तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांनी निर्णय घेतला होता. आजपर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई का केली नाही याबाबत समितीने विचारले असता महामंडळाच्या प्रतिनिधीनी खुलासा केला की, ज्या जून्या व्यवस्थापकीय संचालक यांनी या प्रॉडक्ट्सच्या जाहिरातीचे आणि विक्रीचे काम हाती घेतले होते आता सेवानिवृत्त झाल्यानंतर नवीन येणाऱ्या व्यवस्थापकीय संचालकांना उत्पादन जाहिरातीकरिता व विक्रीकरिता योजनांमध्ये वाव नसतो. अशा प्रकारे यामध्ये अनेक प्रकारचे अडचणी येत होत्या. या संदर्भात जर आपण कोणालाही पाठिशी घालावयाचा प्रयत्न करीत नाही आहात तर मग यासंदर्भातील जबाबदारी लवकरात लवकर निश्चित करून कारवाई होण्यास विलंब का होत आहे ? या ठिकाणी समितीची दिशाभूल करण्याचा तर प्रयत्न होत नाही ना यासंदर्भात महामंडळाचे प्रतिनिधी जर कोणालाही पाठिशी घालण्याचा प्रयत्न करीत असतील तर ते चुकीचे आहे. सर्वसामान्य जनतेची यामधून फसवणूक झाल्यासारखे होईल. यामध्ये मूळ ऑडिट बाजूला सारून यासंदर्भात ४० लाख रूपयाचा जाहिरातीच्या कंत्राटाबाबतचा प्रश्न मध्येच उभा राहिलेला आहे. याबाबत समितीने विचारले असता महामंडळाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, त्यावेळेस त्या जाहिरातीच्या कंत्राटाकरिता तो पैसा खर्च झालेला होता. त्या काळातील अधिकाऱ्यांचा तो निर्णय होता. सदर उत्पादनाच्या संदर्भात दोन ते तीन घटना आतापर्यंत घडल्या **परंतु त्यांच्यावर कारवाई कशी व कोणती करावी यासंदर्भात विचारविनिमय सुरू आहे. या संदर्भातील सर्व धोरणात्मक निर्णय तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांकडूनच घेतले गेले होते.**

६.५ : अभिप्राय व शिफारशी :

या प्रकरणी समितीला मिळालेल्या लेखी व तोंडी माहिती पहाता समिती असे अभिप्राय व्यक्त करते की, महामंडळाचे नवीन उत्पादन सुरु होण्याअगोदरच जाहिरात व विक्री योजनेवर विनाकारण रक्कम खर्च करण्याचे स्पष्ट दिसत असून याप्रकरणी कोणतेही स्पष्टीकरण समितीपुढे आलेले नाही. महामंडळ जर कोणालाही पाठिशी घालावयाचा प्रयत्न करीत नाही तर मग यासंदर्भातील जबाबदारी लवकरात लवकर निश्चित करुन कारवाई करणे आवश्यक आहे. अथवा सर्वसामान्य जनतेची यामधून फसवणूक झाल्यासारखे होईल. याबाबत महामंडळाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, या प्रकरणातील संबंधीतांवर कारवाई कशी व कोणती करावी यासंदर्भात विचारविनिमय सुरू आहे. या संदर्भातील सर्व धोरणात्मक निर्णय तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांकडूनच घेतले गेले होते. या घोटाळयासंदर्भात जबाबदारी निश्चीत करून संबंधीत अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली याबाबतची माहिती समितीला कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे. सन २००३-

२००४ मध्ये महालेखाकारांचा आक्षेप आला त्यावेळी जे व्यवस्थापकीय संचालक व लेखा अधिकारी कार्यरत होते त्यांनी त्यावेळी हा विषय संचालक मंडळापुढे न नेता निर्णय घेतला व घेण्यात आलेला धोरणात्मक निर्णय चूकीचा आहे असे समितीचे मत आहे. त्यामुळे यापुढे धोरणात्मक निर्णय व्यवस्थापकीय संचालक व लेखा अधिकारी यांच्या पातळीवर न घेता बोर्डाच्या मान्यतेने घ्यावे असी समिती शिफारस करीत आहे.

सात : आस्थापना खर्च :-

७.१ : भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००३-२००४ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक २.२६ मध्ये "आस्थापना खर्च" या संबंधात महालेखाकारांनी असे अभिप्राय व्यक्त केले की, कंपनीच्या आस्थापना खर्चाच्या छाननीत खालील बाबी आढळून आल्या.

- मंजूर पदे उपलब्ध नसतांनाची कनिष्ठ अधिकाऱ्यांना मे-जून १९९९ मध्ये पदोन्नती देण्यात आली होती. परिणामस्वरुप व्यवस्थापनाच्या मध्यम स्तरावरील अधिकाऱ्यांच्या मंजूर २९ पदांवर प्रत्यक्ष काम करणारे अधिकारी ८८ होते. कंपनीने (जुलै २००४) म्हटले होते की अधिकाऱ्यांची पदोन्नती उच्चन्यालयाने मान्य केली होती. हे उत्तर समर्थनीय नव्हते. संचालक मंडळाची मान्यता घेण्यात आली नाही या कारणावरुन कंपनीने पदोन्नती रद्द करण्याचे ठरविल्यामुळे न्यायालयीन प्रकरण उद्‌भवले होते. उच्च न्यायालयाने या आधीच पदोनती दिलेल्यांना करण्यास मनाई केली होती. न्यायालयासमोर मर्यादित प्रश्न होता की, अधिकाऱ्यांची पदोन्नती संचालक मंडळाची मान्यता न घेता करणे शक्य होते की, नाही. परंतु मूळ प्रश्न तसाच राहतो की मंजूर पदे नसतांना पदोन्नती करणे अनियमित होते, ती टाळणे आवश्यक होते.

- पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार, फक्त आठ दिवासांचीच आकस्मिक रजा देण्याची परवानगी होती. परंतु कंपनीने १२ आकस्मिक रजा दिल्या होत्या. त्याशिवाय, कामगार संघटनेबरोबर केलेल्या कराराच्या आधारावर सात दिवासांचीच आकस्मिक रजा रोखीकरणाचा फायदा देखील कर्मचाऱ्यांना दिला होता. परंतु राज्य शासनाने पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करतांना असे निर्देश (फेब्रुवारी २००१) दिले होते की, देण्यात येणारे भत्ते हे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या भत्याप्रमाणेच असावे व इतर देण्यात येणारे भत्ते थंबविण्यात यावेत. लेखापरिक्षणाच्या असे निदर्शनास आले की २००१-०२ ते २००२-०३ या कालावधीत कंपनीच्या सात प्रादेशिक कार्यालयांनी व सहा कारखान्यांची त्यांच्या कर्मचाऱ्यांना रजा रोखीकरणासाठी रुपये ३९.६५ लाखाचे अतिरिक्त प्रदान केले होते.

- घरभाडे भत्ता व शहर पूरक भत्ता हे अशा पध्दतीचे पूरक भत्ते आहेत की, अशा घरभाडे व शहर पूरक भत्यांचे प्रदान एका वर्षात बारा वेळेपेक्षा जास्त असू शकत नाही, कंपनीच्या नियमाप्रमाणे घरभाडे व शहर पूरक भत्ता अर्जित रजा रोखीकरणावर देण्यात येत होता तो समर्थनीय नव्हता. यामुळे कंपनीवर मार्च २००३ रोजी संपलेल्या मागील तीन वर्षांच्या कालावधीतील याबाबतचा वित्तीय भार रुपये १५.७८ लाख एवढा पडला होता.

कंपनीने उत्तरात (जुलै २००४) म्हटले होते की, वरील लेखापरिक्षण शेरे विचारात घेऊन अर्जित रजा/ आकस्किम रजा रोखीकरणाच्या तरतुदीचा आढावा घेण्यात येईल.

ही बाब शासनाला कळविली होती (मे २००४), यांचे उत्तर मिळाले नव्हते (डिसेंबर २००४).

७.२ : या प्रकरणी समितीस पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने

असे नमुद केले की, बरेच अधिकारी पदोन्नती शिवाय वरच्या श्रेणीच्या पदांवरचे काम करत होते त्यामुळे त्या अधिकाऱ्यांमध्ये कोणत्याही लाभाशिवाय ते काम करतात असा संभ्रम निर्माण झाला. मात्र एकीकडे महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या विशेष प्रयत्नांनी महामंडळाची एकूण उलाढाल वृध्दिगंत होत होती. वरील बाबीचा आढावा घेतल्यानंतर महामंडळाच्या १०४ अधिकाऱ्यांना कनिष्ठ व मध्यस्तरीय व्यवस्थापन श्रेणीमध्ये पदोन्नती देण्यात आली.

वरील निर्णय व्यवस्थापनाने संचालक मंडळापुढे न ठेवल्याने व मंजूरी न घेतल्याने सदर १०४ अधिकाऱ्यांना कनिष्ठ व मध्यस्तरीय व्यवस्थापन श्रेणीमध्ये पदोन्नतीने देण्यात आली.

वरील पदोन्नती रद्द बादल आदेशावर महामंडळाच्या अधिकारी संघटनेने याचिका क्रमांक १७२०/२००० मुंबई उच्च न्यायालयात सदर आदेश रद्द न करण्याबाबत याचिका दाखल केली. न्यायालयाने महामंडळाने सदर अधिकाऱ्यांची पदोन्नती रद्द केल्याचे आदेश अवैद्य ठरवून पूर्व परिस्थिती लागू करावी असे आदेश दिले.

उच्च न्यायालयीन आदेशावर महामंडळाचे विधीसल्लागार मे. पुरव आणि सहयोगी यांचे बरोबर चर्चा करण्यात आली विधीसल्लागारांच्या मते सर्वोच्च न्यायलयाकडूनही महामंडळाच्या बाजूने निर्णय होणे शक्य नाही म्हणून उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अमंलबजावणी करणे योग्य ठरेल अन्यथा न्यायालयाचा अवमान केल्याचे होईल.

उच्च न्यायालयाच्या आदेशाची अमंलबजावणी करण्यापूर्वी महामंडळाने हया आदेशाला आव्हान दयावे अशा सुचना मा.कृषि मंत्री तथा महामंडळाच्या अध्यक्षांनी दिल्या. त्यानुसार महामंडळाने उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला होता. सुनावणी अंती अर्ज खारीज केला. तद्नंतर ज्या १०४ अधिकाऱ्यांची रद्द केलेली पदोन्नती मागे घेण्यात आली व ज्यांचे काम समाधानकारक होते त्यांना त्या पदावर कायम करण्यात आले.

सदरहू १०४ अधिकाऱ्यांची पदोन्नती उच्च न्यायालयाच्या आदेशा नंतर परिपत्रक ठरावाने संचालक मंडळाच्या सभेसमोर स्विकृतीसाठी मांडला होता या ठरावात असे मांडण्यात आले होते की, उच्च न्यालयाचा निर्णय लागू करतांना ज्या पदावरुन देण्यात आली ती पुढे कमी करण्यात यावीत जेणेकरुन अधिकाऱ्यांच्या पदांची संख्या होंती तेवढीच कायम राहील. उपरोक्त विवरणावरुन असे दिसून येईल की, अधिकऱ्यांची पदोन्नती व मराठी उच्च न्यायालयाने मंजूरी दिल्यावर संचालक मंडळाची मंजुरी घेऊन विषयाचे निराकरण करण्यात आले. दुसऱ्या मुद्याच्या अनुषंगाने असे नमूद करता येईल की, व्यवस्थापनाने हा विषय सेवा नियम व कामगार कायद्यातील तरतूदीचा अभ्यास करुन देय होत नाही असे भत्ते पाचवा आयोग लागू केल्यापासून ज्या कर्मचाऱ्यांनी पाचवा आयोग घेतला त्यांना देणे बंद केले. मुद्या क्रमांक ३ च्या अनुषंगाने असा खुलासा करण्यात येत आहे की, सामान्य रजा व हक्काच्या रजेचे रोखीकरण महामंडळाच्या रजेच्या नियमानुसार करण्यात आले आहे. या रजेचे रोखीकरण पाचव्या आयोगाच्या शासकीय आदेशाप्रमाणे मासिक वेतन भत्ता सदरात मोडत नसल्यामुळे हे अधिदान सुरु ठेवण्यात आले आहे. आता मात्र महालेखाकार यांनी सुचविल्याप्रमाणे दिनांक २८-१२-२००४ पासून हे रोखीकरण बंद करण्यात आले आहे. या बंद करण्याच्या निर्णयास कामगार संघटनेने न्यायालयात आव्हान दिले असून स्थगिती आदेश घेतला आहे. म्हणून महामंडळाने सन २००४ साठी रोखीकरण करुन न्यायालयाच्या अंतिमनिर्णयावर अधिदान केले आहे.

लेखी परिक्षणाच्या अहवालानुसार हा विषय पुन्हा अभ्यासाला जाईल व तद्नुषांने

संचालक मडळांच्या सभेसमोर मांडण्यात येईल.

७.३ : महामंडळाच्या वरील अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

७.४ : या प्रकरणी समितीला महामंडळाकडून व शासनाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने प्रधान सचिव, कृषि विभाग व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी शासकीय निर्देशांचे उल्लंघन करून रू. ३९.६५ लाखाचे अतिरीक्त प्रदान करण्यात आलेले आहे याबाबत समितीने विचारले असता महामंडळाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, या ठिकाणी मुख्यत: पदोन्नतीचा विषय आहे. सन १९९९ मध्ये या ठिकाणी एकूण २२७ पदे होती त्यावेळी व्यवस्थापकीय संचालक श्री. उज्वल उके होते . या ठिकाणी असिस्टंट सहायक, उप आणि विभागीय व्यवस्थापक असे ३ प्रवर्ग होते. बरेच अधिकारी पदोन्नतीशिवाय वरच्या श्रेणीच्या पदावरचे काम करत होते. त्यामुळे त्या अधिकाऱ्यांमण्ये कोणत्याही लाभाशिवाय ते काम करतात असा संभ्रम निर्माण झाला होता. त्यामुळे व्यवस्थापकीय संचालक सेवा नियमांचा आधार घेवून महामंडळाच्या १०४ अधिकाऱ्यांना कनिष्ठ व मध्यस्तरीय व्यवस्थापन श्रेणीमध्ये पदोन्नती दिली. पदोन्नती देण्याच्या संदर्भातील बाब व्यवस्थापनाने संचालक मंडळापुढे न ठेवल्याने व मंजूरी घेतल्याने सदर १०४ अधिकाऱ्यांचे पदोन्नतीचे आदेश रद्दबादल करण्याबाबत याचिका दाखल केली. या याचिकेच्या संदर्भात न्यायालयाने पदोन्नती रद्द करून पूर्व परिस्थिती लागू करावी असे आदेश दिले. शासनाच्या निर्दशाचे उल्लंघन करण्यात आले आहे अशा प्रकारचे लेखापरिक्षकांनी आक्षेप नोंदविले आहेत. व्यवस्थापकीय संचालकानी जागा उपलब्ध नसतांना देखील आपल्या अधिकाराचा दुरूपयोग करून पदोन्नती दिले. या निर्णयामुळे महामंडळाला लाखो रूपयांचा भुर्दंड बसला. तसेच, कमर्चाऱ्यांना निर्णयाविरोधात कोर्टामध्ये जाण्यासाठी व्यवस्थापकीय संचालकांनी प्रोत्साहित केले. स्वत:च्या अधिकाराचा दुरूपयोग करून कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याचा निर्णय व्यवस्थापकीय संचालक घेत असतील तर यामागे निश्चितपणे काहीतरी हेतू त्यांच्या मनामध्ये आहे. व्यवस्थापनाने पदोन्नतीच्या संदर्भात जो निर्णय घेतला होता तो संचालक मंडळाने रद्दबादल ठरविला व उच्च न्यायालयाने सुध्दा तसाच निर्णय दिला होता. त्यामुळे व्यवस्थापकीय संचालकाची ही कृती निश्चितपणे गंभीर बाब आहे. याबाबत समितीने विचारले असता महामंडळाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, महामंडळाच्या सेवा नियमातील तरतुदीनुसार कर्मचाऱ्यांना १२ आकस्मिक रजा मिळत होत्या त्यापैकी ७ आकस्मिक रजा रोख परावर्तीत करण्यात येत होत्या. तशाप्रकारची तरतूद शासनाच्या सेवा नियमामध्ये नाही शासकीय कर्मचाऱ्यांना वार्षिक फक्त ८ आकस्मिक रजा अनुज्ञेय आहेत. तसेच, शासनामध्ये आकस्मिक रजा रोख रकमेत परावर्तीत करण्याची पध्दत नाही. महामंडळाच्या कमर्चाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू केल्यानंतर आकस्मिक रजा रोकण्यात परावर्तीत करण्याच्या पध्दतीला ऑडिटने आक्षेप घेतले आणि डिसेंबर, २००४ पासून आकस्मिक रजा रोखे परावर्तनाची पध्दत बंद करण्याबाबत महालेखाकार यांनी सुचविले. त्याबाबत औद्योगिक न्यायालयामध्ये कमर्चाऱ्यांनी दाद मागितली व आकस्मिक रजा रोखे परावर्तती करण्याच्या निर्णयाला स्थगिती मिळविली. त्यानंतर व्यवस्थापनाने कामगारांच्या

संघटनेशी बोलणी करून १७ ऑक्टोबर, २००६ रोजी करार केला, व आकस्मिक रजा रोखे परावर्तती करण्याची पध्दती बंद केली. महामंडळातील कर्मचाऱ्यांना सन २००१ पासून पाचवा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी महामंडळातील १३०० कमर्चाऱ्यांपैकी ६०० कमर्चाऱ्यांनी पाचव्या वेतन आयोगाच लाभ घेतला, बाकीच्या कमर्चाऱ्यांनी घेतला नाही. त्या कर्मचाऱ्यांना चौथ्या वेतन आयोगाच्या शिफारशींप्रमाणे वेतन मिळत होते. अशा प्रकारे सहा-सात वर्षे महामंडळामधील काही कर्मचारी चौथ्या वेतन आयोगाप्रमाणे तर काही कर्मचारी पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन घेत होतो. अशा प्रकारे महामंडळाची आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतर आणि सन २००६ मध्ये कर्मचारी संघटनेबरोबर बोलणी केल्यानंतर काही अंशी पाचवा वेतन आयोग लागू करण्यात आला. तेव्हापासून त्यांना भत्ते व सुविधा दिलेल्या नाहीत, त्यांचा डी.ए. अर्ज करण्यात आजा. आणि ऑक्टोबर, २००६ पासून आकस्मिक रजा रोखे परावर्तती पध्दत बंद करण्यात आली.

पाचवा वेतन आयोग लागू करण्यासंबंधी शासनाची अशी अट होती की, कर्मचाऱ्यांच्या संघटनेबरोबर बोलणी करून करार करावा. परंतु कमर्चाऱ्यांच्या संघटनेला अटी व शर्ती मान्य नसल्यामुळे त्यांनी उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल केले. तेव्हा उच्च न्यायालयाने आम्ही याबाबत काहीही निर्णय देणार नाही, हा विषय आपण आपसात बसून सोडवावा असा निर्णय दिला. त्यानंतर संघटनेबरोबर पुन्हा बोलणी करून व्यवस्थापनापुढे हा विषय नेण्यात आल्यानंतर सन २००६ मध्ये व्यवस्थापनाने निर्णय घेतला.

महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांच्या वर्ष २००३-२००४ च्या अहवालावर समितीने घेतलेल्या साक्षीत महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.व्यास यांनी निश्चितपणे माहिती देण्याचा प्रयत्न केला. महामंडळाकडून ज्या काही चुका झाला त्यासंबंधी महालेखाकारांच्या आक्षेप होता काही प्रमाणात दूर करण्याचा महामंडळाकडून प्रयत्न करण्यात आला.

७.५ : अभिप्राय व शिफारशी :

महामंडळाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी महामंडळाच्या व्यवस्थापनाने काम केले पाहिजे. तसेच पूर्वी ज्या काही चुका झाल्या त्याचा निपटारा करण्यात आला नाही. याबाबत शासनाने तसेच महामंडळाने आवश्यक ती उपाययोजना करावी अशी समिती शिफारस करीत आहे.

या ठिकाणी पाचव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने परिच्छेद आला आहे. त्यामुळे महामंडळाचे जवळपास ४०-५० लाख रूपयांचे नुकसान झाले. यासारख्या अनेक बाबी आहेत. महामंडळ २-५ कोटीच्या नफ्यात असताना, महामंडळ अतिशय नफ्यात आहे हा समज बदलविण्याची आवश्यकता आहे. फक्त पाचवा वेतन आयोग लागू केल्यामुळे महामंडळ तोट्यात गेले असे म्हणणे योग्य नाही कारण महामंडळांने १२ कोटी रूपयांच्या नुकसानाची रक्कम आता साडेचार कोटी रूपयापर्यंत खाली आणली आहे. तसेच प्रस्तुत वर्षी महामंडळाला १.८१ कोटी रूपये नफा झाला आहे. आणि शासनाकडून २७ कोटी रूपयाचे येणे प्रलंबित आहे व दुसरीकडे विक्रेत्यांकडून १२-१३ कोटी रूपये यावयाचे आहेत. सद्य स्थिती पाहिल्यास महामंडळाला जवळपास ३४ कोटी रूपये बाहेरून येणे बाकी आहेत. महामंडळ व्यावसायिक स्वरूपाचे

असल्यामुळे त्यादृष्टीने व्यवस्थानाने विचार करण्याची आवश्यकता आहे. यासाठी शासनाकडून लवकरात लवकर पेमेंट मिळविण्याची महामंडळाची भूमिका असली पाहिजे. ज्याप्रमाणे शासन प्रलंबित रक्कम मिळविण्याच्या संदर्भात दुसऱ्या पार्टीसमवेत करार करूनच पुढील कामे करीत असतात व त्यानुसार महामंडळाने सुध्दा भूमिका स्वीकारण्याची आवश्यकता आहे. **त्यामुळे केवळ १-२ कोटीच्या नफ्यावरच न थांबता महामंडळाला जास्तीत जास्त नफा कसा होवू शकेल याचा साकल्याने विचार केला पाहिजे. महामंडळाला जास्त नफा झाल्यास मालाची निर्मिती करण्यासाठी आवश्यक असलेला कच्चा माल अल्प दराने मोठया प्रमाणात रोखीने खरेदी करता येवू शकेल काय , जेणेकरून महामंडळाची कामे जलद गतीने होण्यास मदत होईल तसेच अशा महत्वपूर्ण व्यापारात खाजगी व्यापाऱ्यांची एकाधिकाराशाही राहू नये यासाठी शासनाने महामंडळाचा उपक्रम सुरू केला आहे. खाजगी उत्पादक बाजारात स्वस्तात माल विकतात व महामंडळाची किंमत त्यापेक्षा एक किंवा दोन रूपयांनी जास्त असते. परिणामी खाजगी उत्पादकांचा माल मोठया प्रमाणात विकला जातो ही अतिशय गंभीर बाब आहे अशी परिस्थिती निर्माण होवू नये यासाठी महामंडळाने व फायदयाचा व्यावसायीक दृष्टीकोन ठेवून तत्परतेने काम करण्याची आवश्यकता आहे.**

व्यवस्थापकीय संचालकाने अधिकार नसतांना सुध्दा अधिकाराचा गैरवापर करून घेतलेल्या निर्णयामुळे महामंडळाचे झालेले नुकसान या मुद्दयाच्या अनुषंगाने संबंधीतांवर वेळीच कारवाई होणे अपेक्षित आहे . अशा प्रकरणात संबंधितावर पाच पाच वर्षे कोणत्याही प्रकारची कारवाई न करणे ही अतिशय गंभीर बाब आहे याची शासनाने दखल घेण्याची आवश्यकता आहे, अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.

बैठकींचे परिशिष्ट

मंगळवार, दिनांक २१ ऑगस्ट, २००७ विधान भवन मुंबई.

उपस्थिती :

१. श्री. नाना पटोले, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री.चंद्रशेखर भोसले, वि.स.स.

३. श्री.गणपतराव कदम, वि.स.स.

४. श्री.प्रद्युघ्न मेहता, वि.स.स.

५. श्री.राजेंद्र पाटणी, वि.स.स.

६. श्री.दिनकर माने, वि.स.स.

७. श्री.नामदेवराव पवार, वि.स.स.

८. श्री.रविंद्र गायकवाड, वि.स.स.

९. श्री. अरूण पाटील, वि.स.स.

१०. श्री. नारायणराव गव्हाणकर, वि.स.स.

११. श्री.सुरेशदादा देशमुख, वि.प.स.

१२. श्री.सदाशिव आबाजी पोळ, वि.प.स.

१३. श्री.मधुकर रघुनाथ सरपोतदार, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री.उमेश खडकीकर, अतिरिक्त सचिव
श्री. डी.एम.गवळी, समिती अधिकारी

महालेखाकार यांचे कार्यालय :-

श्रीमती संगिता चौरे, महालेखाकार, (वाणिज्यिक लेखा), मुंबई

साक्षीदार :-

कृषी व फलोत्पादन विभाग

१) श्री. नानासाहेब पाटील, प्रधान सचिव, कृषी व फलोत्पादन विभाग.

महाराष्ट्र कृषी विकास महामंडळ मयादित

१) श्री. प्रदिप व्यास, व्यवस्थापकीय संचालक
२) श्री. मंगेश पारकर, महाव्यवस्थापक
३) श्री. मोरेश्वर हरदास, उप महाव्यवस्थापक
४) श्री. श्रीकृष्णा रामराव मोहिते, उप महाव्यवस्थापक खते विभाग

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००३-२००४ च्या (वाणिज्यिक) अहवालातील महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांच्या परिच्छेदावरती विभागीय सचिवांची व महामंडळाच्या प्रतीनिधींची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक ३ ऑक्टोबर, २००७ विधान भवन, मुंबई

उपस्थिती :

१. श्री. नाना पटोले, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२. श्री. संजय चव्हाण, वि.स.स.
३. श्री. रमेशभाई कदम, वि.स.स.
४. श्री.चंद्रशेखर भोसले, वि.स.स.
५. श्री. राजवर्धन कदमबांडे, वि.स.स.
६. श्री. पी.यु. मेहता, वि.स.स.
७. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.
८. श्री. अरुण पाटील, वि.स.स.
९. श्री. नारायणराव गव्हाणकर, वि.स.स.
१०. श्री.सुरेशदादा देशमुख, वि.प.स.
११. श्री.सदाशिव आबाजी पोळ, वि.प.स.
१२. श्री.मधुकर रघुनाथ सरपोतदार, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१) श्री.उमेश खडकीकर, अतिरिक्त सचिव
२) श्री. डी.एम.गवळी, समिती अधिकारी

महालेखाकार यांचे कार्यालय :-

१. श्रीमती संगिता चौरे, महालेखाकार, (वाणिज्यिक लेखा), मुंबई
२. श्री.यु.बी.फाटक, वरिष्ठ लेखा अधिकारी, मुंबई.

साक्षीदार :-

कृषि विभाग

श्री.जे.के.राउत, उप सचिव,
महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित

१. डॉ. प्रदिप व्यास, व्यवस्थापकीय संचालक

२. श्री. मंगेश पारकर, महाव्यवस्थापक

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००३-२००४ च्या (वाणिज्यिक) अहवालातील महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळाच्या परिच्छेदासंबंधात प्रधान सचिव तथा महामंडळाच्या प्रतिनिधीची साक्ष घेतली.

वार, दिनांक डिसेंबर, २०१०, विधान भवन, नागपूर
उपस्थिती

१. श्री. सदाशिवराव पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख.

<u>महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय</u>

श्री.श्रीधर राजोपाध्ये, उप सचिव

समितीने प्रारूप अहवालाच्या मसुद्यांवर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

बैठकींचे परिशिष्ट

मंगळवार, दिनांक २१ ऑगस्ट, २००७ विधान भवन, मुंबई
उपस्थिती

(१) श्री.नाना पटोले, वि.स.स. तथा समिती प्रमुख.
(२) श्री.चंद्रशेखर भोसले, वि.स.स.
(३) श्री.गणपतराव कदम, वि.स.स.
(४) श्री.पद्युघ्न मेहता, वि.स.स.
(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(६) श्री.दिनकर माने, वि.स.स.
(७) श्री.नामदेवराव पवार, वि.स.स.
(८) श्री.रविंद्र गायकवाड, वि.स.स.
(९) श्री.अरूण पाटील, वि.स.स.
(१०) श्री.नारायणराव गव्हाणकर, वि.स.स.
(११) श्री.सुरेशदादा देशमुख, वि.स.स.
(१२) श्री.सदाशिव आबाजी पोळ, वि.स.स.
(१३) श्री.मधुकर रघुनाथ सरपोतदार, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१) श्री.उमेश आ.खडकीकर, अतिरिक्त सचिव

२) श्री.डी.एम.गवळी, समिती अधिकारी

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती संगीता चौरे-महालेखाकार, (वाणिज्यिक लेखा,) मुंबई

साक्षीदार :

<u>कृषि विभाग</u>

श्री.नानासाहेब पाटील,प्रधान सचिव

<u>महाराष्ट्र कृषि उद्योग महामंडळ मर्यादित</u>

१. डॉ.प्रदिप व्यास, व्यवस्थापकीय संचालक

२. श्री.मंगेश पारकर, महाव्यवस्थापक

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००३-२००४ च्या (वाणिज्यिक) अहवालातील महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळाच्या परिच्छेदासंबंधात प्रधान सचिव तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

बुधवार दिनांक ३ ऑक्टोबर, २००७ विधान भवन, मुंबई
उपस्थिती

(१) श्री.नाना पटोले, वि.स.स. तथा समिती प्रमुख.
(२) श्री.संजय चव्हाण, वि.स.स.
(३) श्री.रमेशभाई कदम, वि.स.स.
(४) श्री.चंद्रशेखर भोसले, वि.स.स.
(५) श्री.राजवर्धन कदमबांडे, वि.स.स.
(६) श्री.पी.यु.मेहता, वि.स.स.
(७) श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.
(८) श्री.अरूण पाटील, वि.स.स.
(९) श्री.नारायण गव्हाणकर, वि.स.स.
(१०) श्री.सुरेशदादा देशमुख, वि.प.स.
(११) श्री.सदाशिव पोळ, वि.प.स..
(१२) श्री.मधुकरराव सरपोतदार, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१) श्री.उमेश आ.खडकीकर, अतिरिक्त सचिव

२) श्री.डी.एम.गवळी, समिती अधिकारी

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती संगीता चौरे-महालेखाकार, (वाणिज्यिक लेखा,) मुंबई

श्री.यु.बी.फाटक, वरिष्ठ लेखा अधिकारी, मुंबई

साक्षीदार :

<u>कृषि विभाग</u>

श्री.जे.के.राउत, उप सचिव

<u>महाराष्ट्र कृषि उद्योग महामंडळ मर्यादित</u>

१. डॉ.प्रदिप व्यास, व्यवस्थापकीय संचालक

२. श्री.मंगेश पारकर, महाव्यवस्थापक

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००३-२००४ च्या (वाणिज्यिक) अहवालातील महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळाच्या परिच्छेदासंबंधात प्रधान सचिव तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.